# Pictorial Shivaji

# चित्रमय शिवाजी



भाग १ ला

# Pictorial Shivaji

## Vol. I

# चित्रमय शिवाजी

## भाग १ ला

Editor-Y. N. KELKAR.

2nd Edition

२ री आवृत्ति

1936
१९३६

Price One Rupee
किंमत एक रुपया

**Printed by Mr. Anant Vinayak Patwardhan at the Aryabhushan Press,
House No. 936/3 Bhamburda Peth, Poona City, and**

**Published by Mr.** D. V. Kale, Raygad Memorial Committee, 568 Narayan
Peth, Gayakwad Wada, Poona City.

# INTRODUCTION

( FIRST EDITON )

The 'Chitramaya' or Pictorial Shivaji is, so far as we know, the third attempt to visualise the inspiring career of Shivaji in a series of pictures. It differs from the other two in strictly excluding imaginary or unauthenticated work by recent artists and confines itself to those pictures which can be considered historically valuable owing to their relative contemporaneity. Only fairly old portraits of statesmen and warriors have been included and old drawings of important geographical sites have been incorporated so far as they were available. Where, however, such old and authentic drawings could not be traced their place has been taken by a number of accurate photographs of forts and other important places.

The research difficulties of a strictly historical compilation of this nature are indeed too many to enumerate. Besides, such an enterprise inevitably demands considerable time and expense. These factors make it almost impossible to go to the end of any pre-determined and comprehensive plan of execution and the secretaries had to content themselves with whatever they have been able to present in this first part, which has been obviously put together on the sole basis of 'availability.' It is intended to publish the second instalment of this series as time and finances permit.

This publication has been entirely financed by the Raygad Memorial Committee, one of the two partner-founder institutions of the Shivacharitra-Karyalaya and has been equally largely supplied with pictures by the art-loving Chief of Aundh, to both of whom the credit of this Pictorial ought to go.

As indicated by the title of the book the pictorial side is the most important though it could scarcely be understood without the help of the descriptive portion. The latter is written in three different languages, the English, the Hindi and the Marathi, with a view to make it intelligible to as large a section of the Indian and non-Indian readers as possible. This is a unique feature which is calculated to add to the popularity of the 'Pictorial.'

No pains have been spared to make the descriptive matter as copious as space permitted and free use has, of course, been made of

such reference books as the District Gazetteers and books published by the B. I. S. Mandal, the late Mr. D. B. Parasnis, Sir Jadunath Sarkar and Principal Dr. Balkrishna, to all of whom our thanks are principally due. The laborious search after suitable pictures and the compilation of descriptive matter, we owe to Mr. Yashwant Narsinha Kelkar who deserves our best thanks for acquitting himself so well in the work entrusted to him. It will be seen that he has used not only first rate authorities like the Shivabharat and the Jedhe Chronology but has also made use of Bakhars and thus made his remarks quite comprehensive. For the Hindi portion we are indebted to Mr. V. M. Kolhatkar, Librarian, Sir Parshurambhau College, Poona, and to Mr. G. H. Khare.

We are thankful to Sir Malojirao Ghorpade, Rajasaheb of Mudhol, for pictures on pp. 69 & 70; to Mr. A. D. Parasnis of Satara for pp. 23, 24, 27, 28 and to Mr. J. Karandikar, M. SC., of Poona for p. 61.

We have also to thank the Manager of the Aryabhushan Press, Poona for seeing the work through the press in the short space of a fortnight and the Balodyana Press for executing the block work. We hope that the publication will command the circulation it deserves.

POONA, 15-4-1935.

D. V. APTE,
Secretary, Shivacharitra Karyalaya.

## SECOND EDITION

This is practically a reprint of the first edition with a few changes. A map showing forts and historical places mentioned in the work has been added. It is hoped that this edition will meet with the same reception as was accorded to the first.


POONA, 23-9-1936.

D. V. KALE,
Secretary, Raygad Memorial Committee.

# CONTENTS

## अनुक्रमणिका


| | | | | Page |
|---|---|---|---|---|
| किल्ल्यांचा नकाशा | | | | |
| Shivaji शिवाजी | ... | ... | ... | 1 |
| Shivner शिवनेरी | ... | ... | ... | 6 |
| Torna तोरणा | ... | ... | ... | 10 |
| Rohida रोहिडा | ... | ... | ... | 14 |
| Rajgad राजगड | ... | ... | ... | 18 |
| Panhala पन्हाळा | ... | ... | ... | 22 |
| Vasota वासोटा | ... | ... | ... | 30 |
| Surat सुरत | ... | ... | ... | 32 |
| Sindhudurg सिंधुदुर्ग | ... | ... | ... | 36 |
| Jaswantsing जसवंतसिंग | ... | ... | ... | 40 |
| Pratapgad प्रतापगड | ... | ... | ... | 44 |
| Afzalkhan अफझलखान | ... | ... | ... | 48 |
| Purandhar पुरंधर | ... | ... | ... | 56 |
| Sinhagad सिंहगड | ... | ... | ... | 60 |
| Shahaji and Baji Ghorpade शहाजी व बाजी घोरपडे | | ... | ... | 66 |
| Bombay मुंबई | ... | ... | ... | 74 |
| Mahuli माहुली | ... | ... | ... | 78 |
| Sajjangad सज्जनगड | ... | ... | ... | 80 |
| Ramdas रामदास | ... | ... | ... | 82 |
| Janjira जंजिरा | ... | ... | ... | 86 |
| Raigad रायगड | ... | ... | ... | 88 |
| Bhushan भूषण | ... | ... | ... | 94 |


"चित्रमय शिवाजी"
या पुस्तकांत आलेल्या
किल्ल्यांचा नकाशा.
स्केल १" = ६५ मैल.
सुरत
नाशिक
जव्हार
औरंगाबाद
माहुली
गोदावरी नदी
कल्याण
शिवनेरी
मुंबई
पुणे
तोरणा
सिंहगड
राजगड
पुरंदर
जंजिरा
रायगड
रोहिडा
तुळजापूर
जावळी
प्रतापगड
सज्जनगड
पंढरपूर
भिमा नदी
वासोटा
पन्हाळा
विशाळगड
अथणी
विजापूर
राजापूर
कोल्हापूर
कृष्णा नदी
सिंधुदुर्ग
गोवा



**Shivaji**
**शिवाजी**
**[ Orme's fragments ]**



**Shivaji**

**शिवाजी**

**[ British Museum before 1707 ]**

## SHIVAJI MAHARAJ

Researchers in Maratha History have hitherto been disappointed in securing a really faithful first hand picture of Shivaji. In all, ten different portraits are available. But they are presumably different copies of a westerner's original drawing. The two portraits reproduced here are from Orme's collection and the British Museum collection respectively. Orme's picture was published in England in 1782. The British Museum picture is supposed to have been drawn as far back as 1707. But for a slight improvement and retouching, Orme's picture is undoubtedly a copy of the British Museum portrait.

Marathi chroniclers have at times attempted to describe Shivaji's person and demeanour; but all the same their attempts are scrappy and incomplete; and even for a really faithful piece of that type we still have got to depend upon some westerner's account.

Henry Oxinden, deputed by the Bombay Factors, to be present at the coronation ceremony at Raygad, has described Shivaji's personal appearance.

For the other authentic picture, we are indebted to Rev. Escaliot. Anthony Smith, a servant of the Surat Factors, who was imprisoned by Shivaji's soldiers at the time of the Surat raid in 1664, had the opportunity to observe and admire the person of his captor. On his release after a couple of days he related in detail to Rev. Escaliot the story of his captivity which the latter was careful enough to write down in his diaries. He describes Shivaji thus:—"His person is described by them, who have seen him, to be of mean stature ( i. e. medium height ), lower somewhat than I am ( when ) erect, and of an excellent proportion. Actual ( i. e. active ) in exercise and whenever he speaks, ( he ) seems to smile; a quick and piercing eye and whiter than any of his people."

# शिवाजी महाराज

येथें छापलेलीं महाराजांचीं हीं दोन चित्रें अनुक्रमें ऑर्मसंग्रह व ब्रि. म्युझि-अम संग्रह यांतील चित्रांवरून घेतलेलीं आहेत. ऑर्मसंग्रहांतील चित्र इंग्लंडांत सन १७८२ सालीं प्रसिद्ध झालें. तें ब्रि. म्युझियममधील शिवाजीच्या चित्रांत थोडी दुरुस्ती करून कोणा इंग्लिश चितार्‍यानें तयार केलें असावें, असें सर जदुनाथ सरकार म्हणतात. ब्रि. म्युझियममधील चित्र सन १७०७ पूर्वी काढण्यांत आलें असावें असा तर्क आहे.

वास्तविक विश्वसनीय असें एतद्देशीय चितार्‍यानें काढलेलें महाराजांचें एकहि चित्र उपलब्ध नाहीं. परदेशी चित्रकारांनीं काढलेलीं चित्रें त्यांतल्या त्यांत थोडीं फार विश्वसनीय म्हणतां येतील. तथापि खात्री सांगवत नाहीं. मराठी बखरींतूनहि महाराजांच्या चेहर्‍यामोहर्‍याचें विश्वसनीय वर्णन कोठें म्हणण्यासारखें आलेलें नाहीं. ९१ कलमी बखरींचा कर्ता, सिंहगडच्या पोवाड्याचा कर्ता तुळशीदास शाहीर, चित्रगुप्त व शिवभारतकार यांनीं क्वचित् महाराजांच्या छबीचें व पोषाख-पेहेरावाचें उडतें वर्णन केलें आहे. ज्याला पूर्णपणें विश्वसनीय म्हणतां येईल अशीं, महाराजांना समक्ष पाहून लिहून ठेविलेलीं वर्णनें, दोघां पाश्चात्यांचीं आहेत. त्यांतकीं पहिला हेन्री ऑक्झेंडेन. तो राज्याभिषेकाचे वेळीं प्रत्यक्ष रायगडावर हजर होता व त्यानें कुतूहलानें महाराजांच्या मोहर्‍याचें वर्णन मुद्दाम लिहून ठेवलें आहे. दुसरा गृहस्थ सुरतेचा पाद्री रेव्हरंड एस्कालिएट ( Escaliot ). सन १६६४ सालीं सुर-तेच्या पहिल्या लुटींत इंग्रज वखारवाला अँन्थेनी स्मिथ याला महाराजांनीं दोन दिवस अटकेंत ठेविलें होतें. तेव्हां त्याला महाराजांचें प्रत्यक्ष दर्शन घडलें व त्यांचें वर्णन सुटकेनंतर त्यानें वरील पाद्र्याजवळ जें केलें तेंच त्यानें नमूद करून ठेविलें. विश्वसनीयतेच्या दृष्टीनें ऑक्झेंडेन व एस्कालिअट यांचीं शब्दचित्रें ग्राह्य होत. ऑक्झेंडेन म्हणतो " चेहरा सुंदर व पाणीदार, इतर मराठ्यांच्या मानानें वर्ण गोरा; डोळे तीक्ष्ण, नाक लांब, बांकदार व जरासें खालीं आलेलें, दाढी कापून हनुवटीचे खालीं टोंकदार केलेली, मिशी बारीक असून मुद्रेंत त्वरा, निश्चय, कठोरपणा व जागरूकता हे गुण स्पष्ट दिसतात "

एस्कालिअट म्हणतो, " शिवाजीची मूर्ति मध्यम उंचीची व रेखीव बांध्याची आणि चपळ आहे. तो बोलतांना दरवेळीं जणू कांहीं मंदस्मित करतो आहेसें वाटतें. दृष्टि फार तीक्ष्ण व भेदक आहे. वर्ण सामान्य लोकांपेक्षां जास्त गोरा आहे. " या वर्णनांचा व महाराजांच्या म्हणून दिलेल्या चित्रांचा मेळ वाचकांनींच घालावा.

# शिवाजी महाराजकी तसवीर

अबतक आपके १० चित्र उपलब्ध हैं. लेकिन वे सब किसी पाश्चिमीय चितारीके एकही चित्रकी मुख्तलिफ अवस्थाकी नकलें हैं. यहां दी हुई दो तसवीरें आर्म कलेक्शन और ब्रिटिश म्युझियममेंसे हैं. आर्मवाली तसवीर इ. स. १८८२ में प्रकाशित हो चुकी है और ब्रिटिश म्युझियमवाली तसवीर इ. स. १७०७ में खींची हुईसी मालूम होती है. आर्मकी तसवीर ब्रिटिश म्यूझियम के तसवीरकी नकलसी मालूम होती है. यद्यपि मराठी मुवर्रिख कमीं कमीं आपका वर्णन करते है तोभी वे सब अपूर्ण तथा त्रुटित है.

हेन्री आक्झिंडेननें जो कि आपके राज्याभिषेक समयपर रायगडमें उपस्थित होने के लिये नियत किये गये थे. आपकी सूरतका कुछ बयान किया है.

दुसरी तसबीर रे० इस्कालिटकी खींची हुई है. अँटनी स्मिथनें-जो आपके सूरतपर हम्ला करनेके वक्त कैद किया गयाथा और जिसको आपको देखनेका अवसर प्राप्त हुवा था. इस्कालियटसे आपका वर्णन इस तरह किया है. आपका कद मध्यम लेकिन प्रमाणबद्ध और चपल था, जब आप कहा करते थे तब चेहरेपर स्मित और आखों में तेजसा मालूम होता था.

## FORT OF SHIVNER

The hill-fort of Shivner near the historical town of Junnar in the extreme North of the Poona District, is the birth-place of Shivaji Maharaj who was born there on 19-2-1630.

Shivaji was named after the deity Shivai to whom is dedicated a shrine in the Fort.


The Fort was for some time in the possession of Shahaji, Shivaji's father, but afterwards was held by the Moghals. More than once in his life-time Shivaji tried and failed to recover the place.

In 1673 he succeeded in bribing and winning over the Moghal governor to his side; but at the eleventh hour the governor changed his mind and the design fell through. Again in 1678 Shivaji planned to capture the Fort a second time. His army laid siege to Junnar and at night some soldiers scaled the Fort by rope-ladders. But the garrison got scent and a severe battle ensued in which all the Marathas were put to the sword.

## शिवनेरी

हा किल्ला जुन्नरजवळ आहे. शिवाजी महाराजांच्या जन्मामुळें त्याला तीर्थाचें माहात्म्य प्राप्त झालें आहे. शिवाजी महाराजांचे वडील शहाजीमहाराज यांचाही निवास या किल्ल्यावर कांहीं काळ झाला होता.


शिवनेरी किल्ल्याचें वर्णन करतांना शिवभारतकारानें 'हा किल्ला निजामशहाचा आवडता, यशस्वी आणि बळकट असा असून जणुं काय दुसरा देवगिरी (दौलताबाद) म्हणून लोकांत विख्यात होता' असें लिहिलें आहे.



The Room where Shivaji was born
शिवाजीचें जन्मगृह



Shrine of Shivaee
शिवाईचें देऊळ



**Distant view of Shivneri**

**शिवनेरीचा लांबून देखावा**

या किल्ल्यावर विजयराज नांवाचा निजामशहाचा सरदार रहात होता. त्याच्या जयंती नामक मुलीशीं शहाजीमहाराजांचा थोरला मुलगा संभाजी याचें लग्न झालें. या समारंभानंतर जिजाबाईसाहेब गरोदर होत्या म्हणून त्यांना या गडावर ठेवून शहाजीमहाराज दर्याखानावरील स्वारीसाठीं गेले. ते स्वारींत असतांना इकडे शिवनेरीवर शके १५५१ फाल्गुन वा। ३ रोजीं सायंकाळीं जिजाबाईसाहेब प्रसूत होऊन शिवाजी महाराजांचा जन्म झाला. ( १९-२-१६३० शुक्रवार ).

कांहीं दिवसांनीं शहाजीमहाराजांनीं दर्याखानाचा पराभव केला व ते गडावर परत आले तेव्हां त्यांनीं प्रथम पुत्रमुखावलोकन केलें.

सन १६७३ सालीं शिवनेरीचा किल्लेदार अब्दूल अजीजखान याच्याशीं गुप्त तह करून महाराजांनीं किल्ला बळकावण्याचा घाट घातला होता. पण ऐन्यावेळीं अजीजखान फिरल्यामुळें त्यांचा यत्न निष्फळ ठरला.

फिरून सन १६७८ सालीं महाराजांनीं फौज पाठवून जुन्नर वेढलें व रात्रीं माळा लाऊन लोक किल्ल्यांत चढविले; पण शत्रू सावध होऊन लढाई झाली व गडावर चढलेल्या मराठ्यांची कत्तल झाली.

## शिवनेर

शिवनेर किला जुन्नर के पश्चिमकी तरफ आधे मीलके फासलेपर सह्याद्रीकी श्रेणीकी एक शाखापर बसा हुवा है. वह एक हजार फूट ऊँचे टीलेपर है और चारों तरफ मैदानमें एक मील तक लंबा फैला हुवा है. इसी किलेमें शिवाजी महाराजका जन्म हुवा. यह पहिले अहमदनगरकी निजामशाही रियासत में होनेसे शिवाजीके पिता शहाजीके अधिकारमें था. मगर मुगल सेनापतीनें इसपर अमल पश्चात् स्थापित कर दिया. कई दफें शिवाजी महाराजने यह किला अपने काबूमें लानेकी कोशिश की; पर वे यशस्वी न हुए. और उनके बहुत आदमी तमाम कर दिये गये.

## HILL FORT OF TORNA

The hill—fort of Torna, is about 20 miles South-West of Poona and is in the Bhore State.

In 1646 Shivaji is said to have captured it by some device from the Bijapuri commandant without fighting, and to have found there a great treasure amounting to 2 lacs of Huns.

The Chitnisi Bakhar states the incident to have happened in 1643, while Grant Duff puts it three years later. But really speaking no contemporary document has yet come forth to evidence the above statements.

Prachandgad is another name of Torna and it is claimed that Shivaji himself renamed the fort in that way after its capture. The new name, however, has become quite obsolete except in the official records of the Bhore State, which always denominates the area under the fort, as Prachandgad Taluka.


## तोरणा

शिवाजी महाराजांनीं हा तोरण्याचा किल्ला प्रथम जिंकून स्वराज्याचें तोरण बांधलें अशी समजूत रूढ आहे. तथापि त्याला बखरींखेरीज दुसरा समकालीन निश्चित आधार सांपडलेला नाहीं.

हा किल्ला भोर संस्थानांत असून प्रचंडगड असें दुसरेंहि त्याला एक नांव आहे. सध्यां किल्ल्यावर फारच थोडे जुने अवशेष शिल्लक आहेत. त्यांपैकीं मेंगाईचें देऊळ, दिवाणघर, कांहीं तटांचा भाग व दोन दरवाजे यांचा उल्लेख करतां येईल. तोरणजाईची मूर्ति किल्ल्यावर आहे तिच्या समीप, पायथ्यास, तोरणतळें आहे व जवळ दुसरें एक टाकेंही आहे. चिटणीसांच्या बखरींत ' महाराजांनीं राजकारण करून, किल्ल्यावरील विजापुरी नामजाद लोकांस वश करून भेदानें किल्ला जिंकला; जिंकणाऱ्यांत पासल-



Distant View of Torna
तोरणा किल्ल्याचा लांबून देखावा



Torna Gate
तोरणा दरवाजा



**Torna Budla**
**तोरणा बुदला**



**Torna Sadar**
**तोरणा सदर**

कर, कंक, मालुसरे वगैरे सरदार होते; महाराजांनींच किल्ला पाहून प्रचंडगड नांव ठेविलें, व त्याचा चांगला बंदोबस्त करून मेटें बांधून खबरदारी करविली' असें म्हटलें आहे. हा किल्ला महाराजांच्या तेराव्या वर्षी त्यांच्या ताब्यांत आला असें चिटणीस बखर म्हणते तर ग्रँटडफच्या मतें वयाच्या १६ व्या वर्षी तो हस्तगत झाला.

## तोरणा

यह किला भोर नरेश पंतसचीव की रियासतमें शामील है. तोरणा पूनेसे २० मील दूर है. यह किला सन १६४६ इसवीमें शिवाजी के हाथमें आया. और वहां उनको दो लाख होन मिल गये. अभी इस किलेका नाम प्रचंडगड है और यह भोर रियासतके एक तहसीलका ठाना है.

## ROHIDA

Rohida, otherwise known as Vichitra-gad is a famous hill-fort of Shivaji. It is built on a spur of the Sahyadri range, seven miles to the West of Bhore. At present the fort is in a dilapilated condition and the only remains of historical interest to be found on it are the fifteen water reservoirs or Tankies and a ruined modest temple dedicated to the God Rohid-Mall, the guardian angel or the patron saint of that fort. Not far from this fort rises the majestic hill of Raireswar. It is famous in history as the sacred place where the Mawalis openly vowed allegiance to Shivaji in his mission to win political freedom for Maharastra. Rohida fort is perhaps the first to fall in the hands of Shivaji at the beginning of his career. He was, however, unable to retain the fort at that time which was later captured by the Moghals. He re-captured it for the last time in 1670 ( 2nd of July ).

## रोहिडा उर्फ विचित्रगड

हा किल्ला भोरच्या दक्षिणेस सात मैलांवर आहे. किल्ल्याची चढण १॥ मैल आहे. किल्ल्यावर रोहिडमल्ल नांवाचें देवाचें स्थान आहे. वर पाण्याचीं १०-१५ टांकीं आहेत. या किल्ल्याशेजारीं रायरेश्वराचा डोंगर आहे; तेथेंच शिवाजीमहाराजांच्या व मावळ्यांच्या स्वराज्यस्थापनेबाबत आणा-शपथा झाल्या अशी दंतकथा आहे. शिवाजीचा प्रसिद्ध सरदार जो येसाजी कंक याचा देवघर हा गांव रोहिड्याच्या पश्चिमेस आहे. हा गड २ जुलै १६७० रोजीं (आषाढ वद्य २ बुधवार शके १५९२) महाराजांनीं जिंकला.

चिटणीसी बखरीत रोहिड्याचा उल्लेख खालीलप्रमाणें आला आहे "बांदल देशमुख तर्फ हिरडस मावळ हे येऊन न भेटत, तेव्हां त्यांजवर स्वारी करून धरून आणिले, म्हणोन रोहिडा किल्ला घेतला. त्याजवरून दहशत लोकांस पडली."

( शककर्ते श्री शिव. छ. म. पृ. ६७ )



Shivaji
शिवाजी
[ Prince of Wales Museum ]



Hill Fort of Rohida
रोहिडा

# किले रोहिडा

रोहिडा किलेका दूसरा नाम विचित्रगढ है. यह शिवाजीके मजबूत किलेमेंसे एक गिना जाता था. यह भोर रियासतमें भोरसे ७ मीलके फासलेपर है. आजकल यह किला बिलकूल टूट गया है. इसपर एक रोहिडमल नामक देवताका मंदिर है. यह किलेसे थोडी दूर तक एक दूसरे पहाड़पर रायरेश्वर का मंदिर है जिस देवताके सामने मावले लोग शिवाजीकी साथ आखीर दम निकलने तक न छोडनेकी कसम खाया करते थे. शिवाजीने अपने काबूमें रोहिडा किला सबसे प्रथम ले लिया था. पश्चात् सन् १६७० इसवी तक यह किलेपर मुगल सेनापतीका अमल चलता रहा. मगर शिवाजीने फिर उसको आपने काबूमें लाया.

## RAJGAD

The strong hill-fort of Rajgad is about 30 miles South-West of Poona. It is built on a spur of the hill of the Torna fort. It has three walled redoubts or Machies on the successive terraces of the hill side. This fort served Shivaji as his capital upto 1669. Rajaram, Shivaji's younger son, was born here on 24-2-1670.


## राजगड

पुण्याहून नैऋत्येस ३० मैलांवर असलेला मुरुमदेवाचा किंवा ब्रह्मदेवाचा डोंगर म्हणजेच राजगड. त्यास मुरुमगडहि म्हणतात. किल्ल्यास ३ माच्या आहेत. एक पद्मावती, दुसरी सुवेळा, व तिसरी संजीवनी. पद्मावतीवर १ तळें व पद्मावतीचें देऊळ आहे. तसेंच शंकराचें देऊळ व इमारतींचे अवशेष आहेत. बालेकिल्ल्यावर जननीचें देऊळ, महाराजांची बसण्याची जागा, कळवंतिणीचा महाल, हत्तीमहाल, वगैरे नांवानें ओळखले जाणारे अवशेष आहेत.


शिवाजीची पहिली राजधानी पुरंदर. पण ती शिरवळच्या ठाण्याच्या नजीक व इतर दृष्टीनेंहि गैरसोईची असल्यामुळें राजगडची मजबुती झाल्यावर तेथेंच राजधानीचें ठाणें पडलें व राहण्याचें मुख्य ठिकाण झालें. सर्वांत अधिक काळपर्यंत महाराजांच्या सहवासानें पावन झालेलें असें हें स्थल आहे. राजारामाचा जन्म याच किल्ल्यावर २४–२–१६७० म्हणजे शके १५९१ सौम्य संवत्सर फाल्गुन शु॥ १५ रोजीं झाला. जेधे शकावलींत व शिवभारतांत या गडाचे कांहीं उल्लेख येतात ते असे:—

" शके १५८९ प्लवंग. जसवंतसिंगाची भेटी कार्तिक वद्य ५ स जाली. राजपुत्राचें दर्शन कार्तिक वद्य १३ सोमवारीं होऊन दुसरे दिवशीं औरंगाबादेहून स्वार होऊन राजगडास आले."

" आग्र्याहून संभाजीसह महाराज मार्गसीर्ष शु॥ ५ स राजगडास आले शके १५८८ "



Rajgad Gate
राजगड पद्मावती माचीचा दरवाजा



Rajgad Citadel
राजगड बालेकिल्ला

Rajgad Main Gate
राजगड दरवाजा

शिवभारतांत पुढील उल्लेख आहेत:—

" शिवाजी महाराज पन्हाळ्यावरून शिद्दीजोहाराशीं लढत होते त्यावेळीं जिजाबाईसाहेब राजगडास होत्या."

" शाहिस्तेखान पुण्यास येऊन राहिला त्यावेळीं महाराज राजगडास होते."

" पन्हाळ्याच्या वेढ्यानंतर महाराज विशाळगडाहून राजगडास गेले व तेथें जिजाबाईंस भेटले."

राजगडचा डोंगर प्रथम कधीं घेतला व बांधला त्याचा नक्की विश्वसनीय काल अद्याप उपलब्ध नाहीं. सभासद म्हणतो कीं, " माहुली किल्ला अदलशाही घेतल्यावर मुरबाड म्हणोन डोंगर होता त्यास वसविलें त्याचें नांव राजगड ठेविलें."

चिटणीस पुढीलप्रमाणें माहिती देतो.

" दुरजादेवीचा डोंगर त्याचे सन्निध फार चांगला पाहून, तेथें वस्ती करून किल्ला करावा असें चित्तांत आणून सांप्रदायानुरूप लोक, हवलदार, कारकून नेमून किल्ला केला. त्या पर्वतास तीन माच्या चांगल्या होत्या. त्यांसही काम लावून बांधिल्या व किल्ल्यास इमारत करविली आणि किल्ल्याचें नांव राजगड ठेऊन माच्यांचीं नांवें एक सुवेळा व एक संजीवनी व एक पद्मावती ठेवून चार किल्लेच असें केलें "

शककर्ते श्री. शिव. छ. म. पृ. ६३

"राजगडास येऊन शिवापट्टण असें नांव ठेऊन किल्ल्यानजीक घरें, रस्ते, पेठ असें करविलें व शिवापूर येथें पेठ करविली, आंबराई तेथें व पुण्यांत लावविली."

शककर्ते श्री. शिव. छ. म. पृ. ६९

## राजगढ़

यह किला पूनेसे ३० मीलके फासलेपर नैऋत्य कोनेमें बसा हुवा है. तोरणा और यह किला एकही पर्वत श्रेणीपर है. यह किला सन १६६९ इसवी तक शिवाजीमहाराजकी राजनगर थी और शिवाजीका दूसरा पुत्र राजाराम यहीं पैदा हुवा ( २४–२–१६७० ).

# FORT OF PANHALA

Panhalgad or the fort of Panhala, the famous historical fort in the Kolhapur State in the Southern Maratha country is situated at 16–48' N. and 74–8' E. rising 2772 ft. above sea-level. It is 12 miles to the North-West of the city of Kolhapur.


The hill stands up boldly 300 ft. above the Kolhapur planes and its uppermost top, crowned by the fort, rises 275 ft. above the uplands. The plateau is about 4½ miles in circumference, half the distance of which is protected by a natural sharp scarf 32 ft. high, strengthened by loop holed parapet walls and the rest is fortified by strong stone walls 15 to 30 ft. wide with bastions and ramparts.

It has three magnificent double gateways which are reached from the table-land by long flights of stone steps. Of the 3 gateways Wagh Darwaja or tiger-gate and Char Darwaja or Four-doored gate, have been destroyed and only the third, Tin Darwaja, is now entirely intact.

Panhala was named 'Shah-Nabi-Durg' by Mohommedan conquerers and was made a Sarkar or Division by Bijapur kings.


A large army was sent under Siddi Johar to invest Panhala and recover the lost country. Shivaji thinking Panhala to be a place of greater strength than it really was decided to defend it in person. The Bijapur army arrived in the neighbourhood of Panhala and laid siege to it for 4 months.

Shivaji opened negotiations with Siddi Johar about surrendering Panhala and under the pretext of submission managed to escape to Vishalgad before his plan was suspected. On this occasion Shivaji, to cover his retreat, stationed a party of Mawalis under Baji Prabhu Deshpande of Hirdas



**Panhala Sketch**

**पन्हाळा—हातानें काढलेलें चित्र**



Panhala Plan

पन्हाळा—नकाशा

Mawal, who was asked to guard the pass, called Pavan Khind until a signal of five guns announced the arrival of Shivaji's main body at the fort. The brave commander carried out his master's orders faithfully and while repulsing the attacks of the enemy was fatally wounded.

After the surrender of Panhala to the Bijapur Kings in 1660 it remained with them till 1672.

In 1666 Shivaji led an unsuccessful attack on Panhala which made the Bijapur Court strengthen the garrison with additional forces.

In 1672 Shivaji recaptured Panhala on the 5th of March.

## पन्हाळा

हा प्रसिद्ध किल्ला कोल्हापूरच्या वायव्येस १२ मैलांवर आहे. मुसलमानी अमलांत त्याचें नांव शहानबीदुर्ग असें होतें. सन १३१८ सालीं हा किल्ला मराठे पाळेगारांनीं जिंकला. १४८६ सालीं बहादूरगिलानी नामक बहामनी सरदाराच्या ताब्यांत तो होता. विजापूरच्या बादशहाच्या अमलांत या किल्याची दुरुस्ती व वाढ करण्यांत आली.

अफझलखानाचा वध झाल्यानंतर लौकरच २८ नोव्हेंबर सन १६५९ रोजीं शिवाजी महाराजांनीं पन्हाळा काबीज केला.

२ मार्च १६६० नंतर लौकरच सिद्दी जोहार, रुस्तुम, फाजलखान, बाजी घोरपडे वगैरे आदिलशाही सरदारांनीं किल्यास वेढा दिला. चैत्रापासून ४ महिने हा वेढा टिकला.

१३ जुलै १६६० रोजीं महाराज पन्हाळ्याहून निघून जात असतां सिद्दी जोहारानें पाठलाग केला तेव्हां पावन खिंडींत मोठी लढाई होऊन बाजी प्रभु देशकुलकर्णी ठार झाला. पण महाराज सुखरूप, ६०० लोकांनिशीं विशाळगडास पोंचले व पुढें राजगडास गेले.


पन्हाळ्यास वेढ्यांत महाराज अडकले असतां नेताजी पालकर व सिद्दी हिलाल यांनीं जाऊन वेढा उठविण्याचा प्रयत्न केला, पण तो फसला.

राजगडास पोहोंचल्यावर तेथून पन्हाळ्याचा किल्लेदार त्रिंबक भास्कर याला महाराजांनीं हुकूम पाठविला कीं "किल्ला लढविणें कठीण आहे तरी तो शत्रूस खालीं करून द्यावा," त्याप्रमाणें २२ सप्टेंबर १६६० रोजीं किल्ला शत्रूच्या स्वाधीन करण्यांत आला.

त्यानंतर पुढें ५ मार्च १६७३ रोजीं अण्णाजी पंडितांनीं कोंडाजी फरजंदाबरोबर ६० लोक पाठवून भेदानें पन्हाळा जिंकला. त्या भेदाची हकीगत अशी:—अनाजी पंडित कोंकणांत गेला व पुढें तीन दिवसांनीं रात्रीं कोंडाजी वगैरे तिघेही येऊन पोंचले. नंतर दोराच्या शिड्या, घोरपडी, मेखा वगैरे सामुग्रीसह पायदळ लोक बरोबर घेऊन ते रात्रीच्यारात्रीं तेथून निघाले. त्यावेळीं चोहोकडे दाट अंधःकार असल्यामुळें कोणच्याही दृष्टीस न पडतां अनाजी पंडित आपल्या लोकांसह पन्हाळ्याच्या पायथ्याशीं पोहोचूं शकला. नंतर एकमेकांस हाताचा आधार देऊन ते शत्रूस चाहूल लागूं न देतां किल्ल्याच्या पठारापर्यंत चढून गेले; व त्यांनीं रणशिंग फुंकलें. त्याबरोबर पाहरेकरी जागे होऊन शस्त्रें हातीं घेण्यासाठीं धांवपळ करूं लागले; व किल्लेदार तरवार हातीं घेऊन धांवून आला. त्याप्रसंगीं कोंडाजीनें पुढाकार घेऊन शत्रुपक्षाचे कित्येक शिपाई ठार केले. इतक्यांत पहाट झाली. तेव्हां हा आरडाओरडा कसला चालला आहे याची चौकशी करण्यासाठीं नागोजी पंडित नांवाचा आदिलशाही कारकून आला; तेव्हां त्याला कळलें कीं किल्ल्याच्या दरवाजासमोर आपला किल्लेदार ठार पडला आहे! इतक्यांत गणोजी रवळेकर जवळ आला असें पाहून नागोजी पळून गेला. किल्यावरील इतर अधिकारी देखील यानंतर कैद झाले व पन्हाळ्याचा किल्ला अनाजी पंडिताच्या ताब्यांत आला.


नंतर ४ दिवसांनीं रायगडाहून महाराज पन्हाळ्यास आले व तेथें १ महिनाभर राहिले.

सन १६७८ सालीं संभाजी, शिवाजी महाराजांशीं रुसून मोंगलाकडे गेला होता तो परत आला. पन्हाळ्यास त्याची व शिवाजी महाराजांची भेट १३ जानेवारी १६८० रोजीं झाली. (पौष वा ७ मंगळवार शके १६०१.)



Panhala Ambarkhana

पन्हाळा—अंबरखाना



Panhala Drawing
पन्हाळा—हातानें काढलेलें चित्र

# पन्हालगढ़

किले पन्हालगढ़ ( पर्णालपर्वत ) कोल्हापूर रियासतमें कोल्हापूर शहरसें १२ मीलके फासलेपर समुद्र पृष्ठसे २७७२ फूट और आसपासके मैदानसे ३०० फूट ऊँचा बसा हुवा है. वह परिघमें ४३ मील है और उसकी दीवार १५ से ३० फूट तक चौडी बांधी हुई है. इसके तीन दरवाजे थे. उनपर अच्छी तरहका नुमायिशी काम था ऐसा मालुम पडता है. आजकल एकही दरवाजा बाकी रहा है.

विजापूरके सरदार सिद्दी जौहरने शिवाजी महाराजको चार महिने तक इसी किले पर अटकाया था मगर उन्होंने उसके साथ संधि करने की तैय्यारी बनाओी जिससे वे लोग गाफिल रहने लगे. एक रोज शिवाजी महाराज इस किलेपरसे रातके वक्त अपने लोगोंको साथ लेकर घेरा तोडकर निकल गये. शिवाजी महाराजने सरदार बाजी प्रभु देशपांडे को अपनी मावली फौजके साथ यहां रख्खा था. वह बडे जोरसे विजापूरके सेनापतीके साथ वीरश्रीपूर्वक लढा मगर अन्तमें वह मारा गया उसकी कीर्ति इसी मामलेमें चिरकाल तक रहेगी.

## VASOTA

Vasota, a hill-fort in Javali is situated to the North-West of Tambi at the head of a small valley which branches West from the Koyna. The fort is within the limits of Met Indoli village and on the very edge of the range of Sahyadries. It is a flat topped hill, nearly oval in shape and about 800 feet above the valley. The height on the other ( or Konkan ) side is nearly 3700 feet. The country about Vasota is the most ancient of the hill districts. The Shirkes and Mores possessed it till it was taken by Shivaji after the conquest of Javali. Shivaji named the fort Vyaghragad which name it has not retained.

## वासोटा

हा किल्ला ६ जुले १६६० रोजीं महाराजांनीं जिंकला.


२७ सप्टेंबर १६७१ रोजीं यात्र गडावर महाराजांना २६००० रुपये भरलेले ४ हंडे सांपडले

किल्ला फार विकट असल्यामुळें महाराजांनीं दोन तीन मातबर मुंबईकर इंग्रजांना येथें कैद करून ठेविले होते.


शके १५७७ नंतर म्हणजे स. १६५५ नंतर महाराजांनीं वासोटा किल्ला घेतला व त्याचें नांव " व्याघ्रगड " ठेविलें असें चिटणिशी बखर म्हणते.

## वासोटा

वासोटा नामक दुर्ग सातारा जिल्हेमें जावली तहसीलमें सह्याद्रीपर्वतश्रेणीके एक पहाड़पर ( कुमुद्वती ) कोयना नदीके पास है. यह लगभग ८०० फूट और समुद्रपृष्ठसे ३७०० फूट उँचा है. शिवाजी महाराजके समयके पहिले इस दुर्गपर प्रथम शिरके और पश्चात् मोरे घरानेका अधिकार था. यह किला शिवाजी महाराजने सन् १६६० इसवीमें अपने कब्जे कर लिया.




**Vasota Fort**
**वासोटा किल्ला**



**Surat**
**सुरत**

## SURAT

Surat the premier port of the Moghal Empire in the latter half of the Seventeenth Century was twice sacked by Shivaji—first in 1664 and again in 1670.

It was the greatest commercial centre in India for the distribution of the Persian, Arabian, Egyptian, African, Chinese and European commodities; besides this it was the principal entrepot for the products of Gujrat and the Malbar Coast on the one hand and for the inland produce as far as Patna, Agra, Lahore, Kashmir on the other. No other port could rival its traffic, wealth, prosperity and fame.

Shivaji looted Surat from the 6th to the 10th of January 1664. The port of Surat stood on the south bank of Tapti, 12 miles from the sea; but the city close to the port was quite defenseless; it had no walls to protect it. Its wealth was boundless. "The looting was unresisted and extended over fully four days and nights and Shivaji scorned to carry away anything but gold, silver, pearls, diamonds and such precious ware."

On the 3rd of October 1670 Shivaji plundered it for the second time. He had 15000 horsemen and foot soldiers with him. He plundered it at leisure and took immense quantities of treasure, cloth etc. He carried off with him booty worth 66 lacs of rupees.


## सुरत

सुरत हें मोंगल राज्यांतील एक अत्यंत श्रीमंत व प्रसिद्ध शहर म्हणून नांवाजलेलें होतें. प्रथम १६६४ सालीं व नंतर १६७० सालीं अशी महाराजांनीं दोनदां सुरत लुटली, व अनुक्रमें १ कोट व ६६ लक्षांची मत्ता काबीज केली.

सुरतेचा किल्ला तापी नदीच्या दक्षिण किनाऱ्यावर मुख्य समुद्रापासून ११ मैल अंतरावर बसलेला होता. किल्याबाहेर नजीकच सुरत शहर वसलें होतें. त्याची लोकसंख्या २ लाख होती. नुसतें सरकारी जकातीचें उत्पन्नच १२ लक्ष रुपये येत असे. यावरून सुरतेच्या श्रीमंतीची कल्पना करतां येईल. पहिल्यावेळीं म्हणजे १६६४ सालीं सुरतेसमीप येतांच महाराजांनीं मोंगल किल्लेदार इनायतखान यानें सामोपचारानें खंडणीचें बोलणें करण्यास यावें म्हणून निरोप पाठविला, पण तें त्यानें ऐकलें नाहीं. पण मग महाराज शहरावर चालून गेले तेव्हां तो रयतेच्या संरक्षणाची कांहीं एक तजवीज न करतां किल्यांत जाऊन लपला. याच सुभेदारानें या वेळीं महाराजांवर मारेकरी घालून सुरतेंत त्यांचा जीव घेण्याचा प्रयत्न केला पण तो फसला.


## सुरत

श्रीशिवाजीमहाराजके कालमें सुरत एक अत्युत्तम बंदर था, और अत्यंत धनवान् शहर था. इसमें अंग्रेज, डच ऐसे परदेशी बेपारियोंकी बडी बडी कोठीयां थी. मुगल साम्राज्यका यह एक महत्त्वका और बडा भारी शहर श्रीशिवाजी महाराजनें दो दफे लूटा था, और अटूट धन ले जानेसे मुसलमानी सत्ताकी इज्जत भी लूटी थी.





Shivaji
शिवाजी
" De Gancigng and Raymonds' Inde "



**Sindhudurga Fortifications**

**सिंधुदुर्ग तट**

## SINDHUDURGA

Shivaji experienced determined opposition to his arms from the fortified island of Janjira and hence was anxious to possess an equally fortified island to protect his vessels. He ordered a survey of the coast to be made by his Sardars Tamrojee, Manojee, Gangajee and Shivaji Koli. After much research the rock opposite to Malvan was fixed in 1664 as the site for Sindhudurg. The superintendence of the works was entrusted to Sardar Vishwanath and to the Kudal Desaee. The fort is very extensive, measuring more than two miles round the ramparts. The figure of the fort is highly irregular with many projecting points and deep inundations. This arrangement has the advantage, that there is not a single point outside of the rampart which is not commanded from some point inside.

A shrine, said to be dedicated to Shivaji himself is a special feature of this fort.

## सिंधुदुर्ग

हा किल्ला शिवाजी महाराजांनीं १६६४ सालीं बांधला. मालवणनजीक समुद्रांत कोळ्यांचें गलबतें उभें करण्याचें एक बेट होतें. तेथें हा किल्ला बांधण्यांत आला व सिंधुदुर्ग असें त्याचें नांव ठेवण्यांत आलें. किल्ल्याची जागा ताम्रोजी, मानोजी, गंगाजी आणि शिवाजी कोळी यांनीं शोधिली. बांधकाम कुडाळकर देसाई व कोणी विश्वनाथ नांवाचा सरदार यांनीं करविलें. डच रेकॉर्डसमधील १७ डिसेंबर १६६४ च्या पत्रांत शिवाजी हा किल्ला बांधीत असल्याचा उल्लेख आला आहे. चिटणीसी बखरींत पुढीलप्रमाणें माहिती आहे:—

" मालवण म्हणोन कोळियाचें बेट गलबतें उभीं करण्याचें लाहान आहे तें तुला दिलें. तेथें जागा करावी. " असा दृष्टांत झाल्यावरून दुसरे दिवशीं पाहविलें, तों समुद्राचें पाणी लांब जाऊन ते बेटावरील जागा विस्तीर्ण जाली. याप्रमाणें समुद्र


प्रसन्न होऊन स्थळ दिलें. याजवरून बहूत संतोषी होऊन पांच साहा कोशांवरि समुद्राचें पाण्यांत जागा बेलाग पाहून किल्ला बांधिला. त्याचें नांव सिंधुदुर्ग ऐसें ठेविलें."

हा किल्ला १६°–४' उ० अक्षांश, ७३°–३१' पूर्व रेखांश येथें बांधिला. या दुर्गास ३२ बुरूज असून आंतील क्षेत्र ४१ एकरांचें व घेरा २ मैलांचा आहे. किल्ल्यांत शिवाजीची मूर्ति स्थापिलेली आहे.


# सिंधुदुर्ग

शिवाजीमहाराजनें जब देखा कि जंजीरे किला जितना यह बहुत कोशीश करकेभी मुश्किल है तब उनकी राय हुई कि कोई न कोई दूसरा बंदोबस्तीका किला समुद्र किनारेपर उनके जहाजोंकी सुरक्षितताके लिये उनके काबूमें रहना चाहिये. उन्हे अपने सरदारोंको हुक्म दिया कि ऐसी जगह देखनी चाहिये. उन सरदारोंको मालवण के पास ऐसी कीला बांधनेके लिये योग्य जगह मिली जिसपर किला बांधना शुरु किया और यह काम विश्वनाथ सरदारको और कुडालके देसाईको सुपुर्द किया गया. किला बहुत विस्तृत है और उसका घेर दो मीलका है. घेरेकी अनियमिततासे यह किला बिलकुल सुरक्षित रह सकता है. क्यों की हर एक बाहरी जगहकी सुरक्षितताके लिये एक एक भीतरकी जगह मौजूद है.

यहां एक शिवाजी महाराजका मंदीर है.



Sindhudurga Main Gate
जंजिरे सिंधुदुर्ग दरवाजा



Sindhudurga View from the sea
सिंधुदुर्गचा लांबून देखावा



Maharaja-Jaswantsingh
महाराजा-जसवंतसिंग

## SARDAR—JASWANTSING.

Maharaja Jaswantsing, a powerful Rajput Sardar of the Moghals, accompanied Shahistakhan in his campaign against Shivaji in 1663. On the 5th of April of that year under cover of night Shivaji, with a picked body of his tried lieutenants, managed to enter the very private tents of the Khan and surprised him completely.

The Khan was slightly wounded and escaped with the loss of his two fingers. This uncommon daring on the part of the Maratha leader caused considerable sensation in the Moghal camp and the Khan was ultimately led into the belief that some Sardar of his own army had played him foul. Jaswantsing had encamped near by at the time of the affray and was generally reported to have remained idle throughout the whole affair. No wonder suspicion was very naturally directed against him. This, however, is the Moghal version of the incident and contemporary Marathi letters do not corroborate it.

Soon after this memorable affair, Shahistakhan retired to the North. Jaswantsing remained behind at Poona till November. In that month he marched out and besieged Kondhana. A protracted siege of six months followed and Jaswantsing had ultimately to retire from the fort with a heavy loss in killed and wounded.

## महाराजा जसवंतसिंग

हा मातबर रजपूत सरदार शिवाजीवरील मोहिमेंत शाहिस्तेखानाबरोबर हजर होता. त्याचे १०००० घोडेस्वारांचें एक पथक होतें. ता. ५ एप्रिल १६६३ रोजीं रात्रीं शिवाजीनें शाहिस्तेखानावर छापा घालून त्याची दुर्दशा उडविली, ' त्यावेळीं खानाच्या तळाजवळच जसवंतसिंगाचाहि तळ होता. तथापि त्यानें छाप्याचा प्रति-

कार केला नाहीं, किंवा मागाहून पाठलागहि केला नाहीं. याचें कारण तो आंतून शिवाजीला फितूर झालेला असावा, असें मुसलमान इतिहासकार समजतात. दुसऱ्या दिवशीं रिवाजाप्रमाणें इतर सरदारासारखा जसवंतसिंग खानाच्या समाचारास गेला तेव्हां खानानें उपरोधिकपणें हंसून म्हटलें, "अरे वा! तुम्ही जिवन्त शाबूतच आहां होय! मी समजतों कीं तुम्ही कालच्या दंगलींत लढत असतां खरत झालांत." तथापि या आख्यायिकेला मराठी साधनांचें प्रत्यंतर मिळत नाहीं. किंबहुना शिवाजीनें छाप्यानंतर रावजीरावाला जें पत्र लिहिलें, त्यांत आपण स्वतःच अंगेजणीनें धाडस करून शास्ताखानाची शास्ती केल्याचें लिहिलें आहे. जसवंतसिंगासंबंधीं त्यांत उल्लेख नाहीं किंवा व्यंजनाहि नाहीं.

शाहिस्तेखान परत गेल्यानंतर जसवंतसिंगाचा तळ बरेच दिवस पुण्यासच होता. त्या सालच्या नोव्हेंबरांत त्यानें कोंढाण्यास म्हणजे सिंहगडास जाऊन वेढा दिला. सहा महिनेपर्यंत वेढा बसवूनहि किल्ला सर होईना. अखेर एक निकराचा एलगार त्यांनीं केला. पण त्यांत त्यांचे शेंकडों लोक खपले. पुढें त्याजबाबत त्याचा मेहुणा भावसिंग हाडा याच्याशीं त्याची बाचाबाची होऊन अखेर दोघेहि १८ मे १६६४ रोजीं वेढा उठवून निघून गेले.


## सरदार जसवंतसिंग

यह एक पराक्रमी रजपूत सरदार मोंगलोंके तैनातमें था. षाहिस्तेखां के साथ उसको शिवाजीपर भेजा था. शिवाजीने अपने बाकबगार सिपाहियोंके साथ रात्रके वक्त उनपर हमला चढाकर खांको घेर लिया. षाहिस्तेखांको बडी चोट आयी और उसके एक हातके दो अंगुलियां कट गयी. मोंगल सैनिक बहुत घबराहटसे तितर-बितर हो गये. जसवंतसिंग अपनाही बचाव कर रहा है ऐसी खबर षाहिस्तेखां को मिली. यह बात मुसलमानोंने बतलायी है मगर इसका कोई पुरावा मरहटी बखर या कागजपत्रोंमें नहीं मिलता.

इसके बाद षाहिस्तेखां दिल्लीके तरफ चला गया. जसवंतसिंग पूनेमेंही ठहरा था. उसी महिनेमें ( नवंबरमें ) कोंडाणे किलेपर उन्हें हमला चढवाया मगर उसके बहुत लोग मारे गये और उसको वापीस जाना पडा.



**Shivaji**
**शिवाजी**



Pratapgad-from the ramparts
प्रतापगड-तटावरून देखावा



Afzulla-Tower
अफझलखानाचें डोकें चिणलेला बुरुज ऊर्फ अफजल बुरुज

## PRATAPGAD

Fort Pratapgad in Javli, 3543 feet above the sealevel, and eight miles West of Mahabaleshwar, is built on a range which forms a spur of the Mahabaleshwar hills. The fort occupies the highest point in the range with full and commanding view of the surrounding country. The upper fort is built on the crest of the hill and the lower fort is immediately below on the South and East; both overlook the surrounding country and guard the passage to the hill on almost all sides.

The upper fort is 200 yards long and 200 yards broad. The lower fort is 350 yards long and 120 broad, and is on the eastern and southern side of the hill which is rocky and precipitous. The eastern side has a strong out-work ending in a tower. The out-work was added by Shivaji after the incident of Afzalkhan, whose head is buried beneath the tower which bears his name.

The fort is said, by some chronicleres, to have been built in 1656 by the famous Brahmin Minister Moropant at the command of Shivaji upon this high rock near the source of Krishna, thereby securing access to his possessions on the banks of the Nira and Koyna.

Pratapgad is famous for the memorable meeting of Shivaji and Afzalkhan when the former had to kill Afzal Khan in self-defence ( 10-11-1659 ). A great battle was fought and 3000 Bijapurians were put to the sword.

In 1661 Shivaji dedicated a temple to Bhavani on this fort. It is on the eastern side of the lower fort.

## प्रतापगड

हा किल्ला जावळी तालुक्यांत मेढ्याचे ईशान्य दिशेस २० मैलांवर व महाबळेश्वराहून पश्चिमेस अवघा ८ मैलांवर अभेद्य जागीं बांधला आहे. १६५६ च्या सुमारास हा किल्ला शिवाजीनें बांधविला असें बखरींतून म्हटलें आहे. किल्यावर

शिवाजीनें बांधलेलें भवानीचें देऊळ व अबदुल्ला बुरुज प्रेक्षणीय आहेत. अफजल-खानास मारल्यावर त्याचें शिर या बुरजाखालीं पुरल्यामुळें त्याला अबदुल्ला बुरुज म्हणतात. अफजलखानाची समाधि किल्ल्याखालीं कांहीं अंतरावर आहे. पूर्वी ती उघडी होती आतां त्यावर मुसलमानांनीं आच्छादन करून चांगली व्यवस्था ठेवली आहे. अफजलखानाच्या वधामुळें व त्यानंतर किल्ल्याखालीं झालेल्या मराठे मुसलमानांच्या घनघोर युद्धामुळें हा किल्ला हें एक ऐतिहासिक क्षेत्रच समजतात.


" महाराजांची श्रीतुळजापूरचे देवीचे ठाई अत्यन्त भक्ति तुळजापुरीं दर्शनास जावें हे इच्छा जाहली. यावरि श्रीनीं दृष्टांत दिल्हा कीं, ' आपणांस येथेंच मूर्ती करून स्थापना कर, म्हणजे तुझें नवस मानसिक येथेंच पुरवीन. ' याजवरून महाराजांनीं गंडकीची शिळा आणवून कारेगार तुळजापुरीं पाठवून तेथील ध्यानाप्रो मूर्ती अत्यन्त सुन्दर करविली. आणि प्रतापगडावरि श्रीदेवीची स्थापना केली."

शककर्ते श्री. शिव. छ. म. पृ. १३७

शके १५८१ मार्गशीर्ष शुक्ल ७ गुरुवारीं मध्यान्हीं अफझलखान प्रताप-गडाखालीं मारला गेला. नंतर प्रतापगडाखालीं झालेल्या लढाईतून मुसेखान, व अफजलखानाचा थोरला मुलगा हे वेषांतर करून पळाले व मंबाजी भोंसले ठार झाला आणि रणदुल्ला, अंबरखान व राजाजी घाटगे पाडाव सापडले.

## किले प्रतापगढ

यह दुर्ग जावली तहसीलमें महाबलेश्वरके पहाड़के नज़दीक के ३५४३ फूट ऊँचे दूसरे पहाड़पर मौजूद है. किलेकी उँचाई बहुत होनेसे आसपासका तमाम मुल्क इसपरसे चारोंतरफ बडा आनंददायक नजर आता है. इसी किलेके दो विभाग है एक उपरका और दूसरा नीचेका. उपरका विभाग २०० यार्ड लंबा और २०० यार्ड चौड़ा है. और नीचेका १५० यार्ड लंबा तथा १२० यार्ड चौड़ा है. इसी किलेपर शिवाजीकी विजापूर दरबारके सरदार अफजलखांसे मुलाकात हुई थी. उसका कपट शिवाजीको मालुम होतेही उसने उसी वक्त अफजलखांको बाघनखसे मार डाला ( १०-११-१६५९ ). सन् १६६१ ईसवीमें भवानी देवीका मंदीर शिवाजीमहाराजने इसी किलेके नीचेके विभाग के पूरबकी तरफ बनवाया था.



**Pratapgad-Inner View**
**प्रतापगड-गडावरील देखावा**



Afjalkhan
अफ़जलखान

# AFZALKHAN

The lineage and early career of Afzalkhan are rather obscure. He is first noticed as a personal attendant of Ranadullakhan. Brave and enterprising, he soon rose to fame as a captain and soon after was promoted to higher offices in the military service of the Bijapur Kingdom; so that by 1636 he was rightly recognised as one of the foremost generals of his times. Shahaji, Shivaji's father was also in the Bijapur service and was perhaps superior to him in many respects. Afzalkhan, Shahaji and Ranadulla had to work together in the Karnatak expeditions and Afzal bore a grudge against Shahaji since then. After the unsuccessful siege of Chandawar Afzal charged Shahaji with secretly supplying provisions to the besieged. This caused bitter enmity between Ranadulla and Shahaji and the result was that both measured swords with each other on the field of Pandharpur.

In the third expedition into the Karnatak, Shahaji and Ranadulla marched on Bangalore and Afzal was deputed to capture Sira. He assured safety to the Naik of Sira, brought him for an interview and there butchered him in cold blood. Sira was first plundered and then handed to the traitor Kenganaik.

In 1654 Shahaji was appointed Governor of the Karnatak. He sent Sambhaji, his son and Afzal to subdue the Naik of Kanakagiri. Afzal secretly contrived to confer with the Naik and they resolved to put an end to Sambhaji's life. He was shot dead with a cannon-ball and it was universally suspected that the Khan had a hand in the ugly episode.

Alarming reports of Shivaji's continued conquests and devastations perturbed the Bijapur Court for a long time and at last it decided to launch a campaign against him. A grand army of 12000 horse, 10000 soldiers with 400 field pieces was drawn and Afzal was appointed General. The


grand army marched from Bijapur and came to Manakeshwar. On its way the Khan desecreted the famous Hindu Temple of Tuljapur. From Manakeswar the Khan changed his route and went to Wai via Pandharpur as news was received by him that Shivaji had left Poona fcr Pratapgad. From Wai the Khan opened friendly negotiations with Shivaji. But his real intention was to finish Shivaji. Shivaji was already informed of the Khan's secret designs. Forewarned he was fore-armed. He wore a mailed tunic under his garment. The memorable meeting took place on 10-11-1659. Afzalkhan while pretending to embrace Shivaji in Maharatha fashion whipped out a dagger and stabbed Shivaji, which fortunately had no effect. Shivaji, extricating himself from the Khan's grip, drew his sword and wounded him mortally.

## अफझलखान


अफझलखानाच्या वधाचा प्रसंग हा शिवचरित्रांपैकीं फार महत्त्वाचा भाग होय. यावेळीं शिवाजीमहाराज वांचले हा मराठी स्वराज्याचा पुनर्जन्मच समजतात.

अफझलखान हा प्रथम विजापूर दरबारांतील प्रसिद्ध सरदार रणदुल्लाखान याचा खिजमतगार होता. तो जात्याच फार शूर, साहसी व कडवा असल्यामुळें थोड्याच दिवसांत प्रसिद्धीस आला. श. १५५८ ( सन १६३६ ) पासून रणदुल्लाच्या हाताखालीं पराक्रम गाजवून त्यानें नांव मिळविलें होतें. त्यानंतर क्रमाक्रमानें वाढत जाऊन तो विजापूर दरबारांतील एक प्रमुख व कर्ता सरदार झाला. शहाजी व अफझलखान यांची चुरस फार होती. आपली दुसरी कर्नाटक मोहीम संपवून रणदुल्लाखान परत आल्यावर मागून शहाजीही देशीं आला. त्यावेळीं शहाजीनें चंदावरच्या राचेवार मराठ्यांना अंतस्थ मदत देऊन राजद्रोह केला अशी खोटी चहाडी अफझलखानानें शहाजीविरुद्ध केली. त्यामुळें रणदुल्लाखान व शहाजी यांचें उघड वैर पडून पंढरपुराजवळ एक चकमकही झडली.

खानाच्या कलागती स्वभावाप्रमाणें त्याच्या दगेखोर स्वभावाचाही नमुना पहाण्यासारखा आहे. रणदुल्लाखान व अफझलखान यांनीं शिऱ्यास वेढा दिला होता. त्यावेळीं अफझलखानानें शिरेकर राजास बेलभंडार देऊन भेटीस आणून दग्यानें त्याचा



**Pratapgad–Tomb of Afzalkhan Before recent repairs**
**प्रतापगड-अफजलखानाचें थडगें, पूर्वस्थिति**



Pratapgad–Afzalkhan's Tomb After repairs
प्रतापगड-अफजलखानाचें थडगें सद्यःस्थिति

मून पाडला व किल्ला जिंकला. तसेंच श. १५७६ ( इ. स. १६५४ ) च्या कनकगिरीच्या वेढ्यांत खुद्द शहाजीचा वडील मुलगा संभाजी याला खानानें दगा करून मारविलें होतें.

जिंजीच्या वेढ्याच्या वेळीं बाजी घोरपड्यानें शहाजीस कैद केल्यावर शहाजीची अप्रतिष्ठा करण्याकरितां त्याच्या पायांत बेड्या घालून त्याला हत्तीवरून विजापुरांत मिरविलें त्यांत खान होताच.

श. १५५० ते १५६५ पर्यंत वांई परगण्याची सुभेदारी रणदुल्लाखानाकडे होती; पण रणदुल्लाचे हुकूम चालू करण्याचीं कामें अफजलखानालाच तेथें करावीं लागल्यामुळें वांई परगण्याचा तो पूर्ण माहितगार झाला होता. श. १५६५ त रणदुल्लाखान मेल्यावर ५।६ वर्षांनीं खानाला वांईची सुभेदारी मिळाली. त्यानें त्यानंतर श. १५७१ मध्यें जावळीच्या मोऱ्यावर स्वारी केली. या मोऱ्याला आदले वर्षी शिवाजीनें गादीवर बसविलें होतें. म्हणजे श. १५७१ पासूनच शिवाजीचें व खानाचें वैमनस्य सुरू झालें. श. १५७६ ते १५७९ पर्यंत अफझलखानाला तेरदळ परगण्यांत व कर्नाटकांत कामगिरीवर जावें लागलें. इकडे शिवाजीनें चंद्रावाला मारून जावळी व रायगड कायमचें जिंकलें.

श. १५८१ मध्यें अफझलखानाची शिवाजीच्या स्वारीवर नेमणूक झाली. त्याच्याबरोबर १२००० घोडेस्वार, १०००० पायदळ, ७५ मोठ्या तोफा व ३०० हलक्या तोफा होत्या. येवढें सैन्य असतांही शिवाजीशीं उघड लढाई न करतां सामोपचारानें बोलणें लावून त्याचा नाश करावा अशी खानाला अंतस्थ सूचना होती. खान विजापुराहून तुळजापुरावरून माणकेश्वरापर्यंत आला. दोन्ही ठिकाणीं त्यानें देवळें उध्वस्त केलीं. मग पुण्याचा रोख सोडून करकंब पंढरपूरमार्गे वांईस आला. खानानें घरोब्याचें बोलणें लावून व कृष्णाजी भास्कर नांवाचा वकील पाठवून शिवाजीस भेटीस बोलाविलें. शिवाजीनें खानाकडून बेलभाक घेतली. पण चौकशीअंतीं दग्याचा विचार पाहून त्यानें खानास लष्करासह जावळीस बोलाविलें. त्याप्रमाणें खान लष्करासह कोयनाकांठीं गेला. अखेर प्रतापगडाखालीं माचीवर भेट घेण्याचें ठरलें. भेटीसाठीं सदर तयार केली होती. भेट श. १५८१ मार्गशीर्ष शु. ७ गुरुवारीं ( १० नोव्हेंबर १६५९ रोजीं ) झाली. भेटीचे वेळीं खानानें शिवाजीची मान डाव्या हातानें खाकेंत दाबून धरली व कट्यारीनें कुशीवर वार केला. म्हणून शिवाजीनेंही दुसऱ्या हातानें खानाच्या पोटावर वार केला. खानाचे लोकांशीं लढाई


घेऊन मराठ्यांनीं त्याचे फार लोक मारले व लूट केली. खानाचें मुंडकें कापून घेऊन अफझल बुरुज बांधला व मारल्या ठिकाणीं कबर केली. ती अद्याप सुस्थितींत आहे.

## अफजलखां

अफजलखाकां शिवाजीके साथ उसकी मुलाकात होने के पहिला चारिन्य बिलकुल अज्ञात है. इतना मालुम पडता है कि यह रणदुल्लाखांका खासगी नोकर था. यह बहुत शूर वीर होनेसे सरदार के दर्जेतक विजापूर दरबार में बढ गया. इतनाही की १६३६ इसवी में यह खास अव्वल दर्जेका सरदार बन गया. शिवाजी के पिता शाहजी उस अफजलखांके उप्परके दर्जेका था. ये तीनों सरदारोंको कर्नाटक जितना शुपूर्द किया गया था. अफजलखांने शाहाजीपर चंदावर के हमलेमें शत्रुओंको सामग्री पहुंचानेका आरोप किया. नतीजा यह हुआ की रणदुलाखां और शाहाजी ये दोनोंके बीचमें शत्रुत्व बढ गया और ये दोनोंकी पंढरपूर के रणभूमीपर लडाई हुई.

शाहाजीको १६५४ इसवीमें कर्नाटक प्रांतपर अधिकारी नियुक्त करदिया. कनकागीरीके नाईकको जीतनेके लिये उन्हें आपना लडका संभाजी और अफजलखांको भेज दिया. कनकगिरीके नाईक और अफजलखां एक होगये और उन्हें संभाजीको तोपकी गोलेसे मार डाला.


शिवाजीकी मुल्कागिरीसे विजापूर दरबारमें बहुत हलचल मच गयी और उसका बंदोबस्त करनेका निश्चय किया गया. १२००० घोडदल और १०००० पायदल और ४०० तोपें अफजलखां के अधिकारमें दी गयी. यह बहुत बडी सेना लेके खांसाहेब माणकेश्वरतक पहुंच गया. रास्तेमें तुलजापुरका हिंदु लोगोंका पवित्र मंदीर उन्होंने तोड डाला. माणकेश्वरसे वह पंढरपूर रास्तेसे वाई प्रांतके तरफ चला गया. क्यों कि रास्तेमें उसको शिवाजी पूनासे प्रतापगड चले जानेकी खबर मिली. वाईमें खांसाहेब शिवाजीके साथ सलाह करनेकी बात चित करने लगे. मगर उसका प्रधान हेतु शिवाजी को मार डालनेका था. यह बात शिवाजीको मालुम हुई जिससे वह हमेशा हथियारबंद रहने लगे. दोनोंकी मुलाकात १६५९ इसवीमें नवंबरकी दस तवारिखको हो चुकी. मुलाकात होते वक्त शिवाजीके शरीरमें अफजलखांने खंजीर घुसेडनेका यत्न किया. उसमें वह सफलता न पाया. शिवाजीने जलदी करके अपनेको अफजलखांसे छुडा कर खांसाहेबके पेटमें हतियार घुसडा दिया.



Pratapgad-Afzalkhan's Tomb After repairs
प्रतापगड-अफजलखानाचें थडगें सद्यःस्थिति



Purandar View
पुरंदरचा दुरून देखावा



Purandar Kedareshwar Temple
पुरंदर केदारेश्वर

# PURANDAR FORT

The Famous Hill-fort of Purandar 18 miles S. S. E. of Poona and 6 miles South-West of Saswad, rises 4564 feet above the sea-level and has a sister fort of Rudramal commonly known as Vajragad or Vajeergad. It is 3616 feet high and commands the Machi or lower fort of Purandar.

In 1649 Shahaji was imprisoned in the Karnatak and a campaign was led against Shivaji under Musekhan and Fattekhan. The Bijapurians invested Shirval and besieged Purandar. Shivaji who was then at Purandar led a sortie against the besiegers and dislodged them completely.

Again in 1665 the fort was besieged, this time by Dilerkhan, the Moghal General. The siege began on the 31st of March 1665 and lasted till June 12th. The garrison defended it against heavy odds and even lost their brave leader Moorar-Baji, who was killed while leading down a sortie against the besiegers. At last by the treaty of 1665 the fort was delivered to the Moghals and continued in their possession till 1670, when Nilopant Muzumdar, Shivaji's lieutenant, stormed and captured it.

Sambhaji, the eldest son of Shivaji, was born at Purandar on 14-5-1657.

# पुरंधर

हा किल्ला सिंहगड इतकाच सुप्रसिद्ध आहे. ही महाराजांची पहिली राजधानी. १६४९ सालीं शहाजी महाराजांना कैद झाल्यावर विजापूरकरांचें सैन्य फत्तेखान व बल्लाळ या दोन सरदारांच्या नेतृत्वाखालीं महाराजांवर चाल करून गेलें. तेव्हां महाराजांची व विजापुरकरांची कोट-शिरवळ व पुरंदर येथें युद्धें झालीं. महाराज खासे पुरंदरास होते. पुरंदरावर हल्ला करीत असतां मुसेखान ठार झाला, व फत्तेखान रणांगणांतून पळून गेला. एका समकालीन पत्रांतही या लढाईची हकीगत दिली आहे. (शि. च. सा. पृष्ठ ५४)


ज्येष्ठ शु. १२ शके १५७९ हेमलंबी संवत्सर–१४ मे १६५७ रोजीं या गडावर संभाजी महाराजांचा जन्म झालेला आहे. त्यापूर्वी म्हणजे श. १५७८ मध्यें हा किल्ला शिवाजी महाराजांनी ताब्यांत घेतला असावा.

३१ मार्च १६६५ रोजीं शिवाजी महाराज पुरंदरास गेल्याचा दाखला सांपडतो. त्याच सालीं मे महिन्याच्या सुमारास जयसिंग व दिलेरखान यांनीं पुरंदरास वेढा दिला. नंतर १२ जून रोजीं महाराजांनीं जयसिंगाची भेट घेऊन त्याच्याशीं तह केला. नंतर १६७० पर्यंत हा किल्ला महाराजांकडे नव्हता. तो त्यांनीं ८ मार्च १६७० रोजीं निळोपंत मुजुमदारांना पाठवून जिंकला. त्या युद्धांत केसो नारायण नऱ्हेकर ठार पडले.

हा किल्ला पुण्याच्या समीप आहे. किल्ला फार बळकट व दुर्गम जागीं वसला आहे. किल्ल्याशेजारीं अगदीं लागूनच दुसऱ्या एका फाट्यावर रुद्रमाळ किंवा वजिरगड नांवाचा दुसरा किल्ला आहे. वजिरगडाची जागा पुरंदरावर तोफा चालविण्यास चांगली सोयीची असल्यामुळें ती जागाहि बांधून काढून तिला किल्ल्याचें स्वरूप देण्यांत आलें. पुरंदर किल्ला फार पुरातन होता. तो सरनाईक चांबळीकर घराण्याच्या ताब्यांत असे. त्या घराण्यांत गृहकलह लागला तेव्हां शिवाजीनें राजकारण करून युक्तीनें तोफा चढवून किल्ला हस्तगत केला.

## पुरंधर किला

यह किला पूनेसे १८ मीलके फासलेपर आग्नेय कोनेमें ४५६४ फूट ऊंचे पहाड पर मौजूद है. इसके नजदीख रुद्रमल या वज्रगड नामक दुसरा किला है वह ३६१६ फूट उंचाईपर है. सन १६४९ ईसवीमें शिवाजीने यह किला विजापूरके सरदार मुसे खान और फत्तेहखानसे लडकर अपने काबूमे करलिया. सन १६६५ ईसवीमें दिलेरखान मोगलोंके सरदारने यह किला घेरलिया था. उनकेसाथ शिवाजीने संधि कर ली और उनके ताबेमें यह किला दे दिया. किंतु सन् १६७० इसवीमें निलोपंत मुजुमदार नामक शिवाजीके सरदारने हमला करके यह किला अपने काबूमें लाया. शिवाजीके प्रथम पुत्र संभाजीकी जन्मभूमी इस किलेपर है.



Purandar Gate, View of the lower Fort
पुरंदर माची दरवाजा



Rudramal Fort
रुद्रमाळ किल्ला




Sinhagad
सिंहगड



Sinhagad Poona Gate
सिंहगड पुणें दरवाजा



Sinhagad Zunzar Tower
सिंहगड झुंझार बुरुज

## FORT OF SINHAGAD

Sinhagad about 15 miles South-West of Poona stands on one of the highest points of the Sinhagad-Bhuleshwar range, 4322 feet above sea-level and about 2300 feet above the Poona plane.

This great stronghold lies on the summit of a flat topped rock, which rises above the hilltop with sheer precipices nearly fifty feet high. Crowning the cliffs is a long loopholed wall with bastions at frequent intervals. Tanaji the renowned sardar of Shivaji Maharaj, captured it on the 4th February 1670. Tanaji and his Mawalis scaled the cliffs by means of a ropeladder attached to a mountain lizard ( guana ) in the dead of night and surprised the garrison. He however lost his life in the fight that ensued.

## सिंहगड

हा किल्ला पुण्यापासून नैऋत्य दिशेस १५ मैलांवर आहे. त्याला कोंढाणा असें जुनें नांव असून औरंगजेबानें हस्तगत केल्यानंतर बक्षिंदा बक्ष असें त्याला नांव दिलें. दादाजी कोंडदेव शके १५६९ च्या आषाढांत वारल्यावर ५।७ महिन्यांनीं शिवाजीमहाराजांनीं हा किल्ला जिंकला. " कसबें खेडें बारें येथेंही वाडे बांधले. तेथून बापूजी मुद्गल नऱ्हेकर देशपांडे तर्फ खेडेंबारें यांच्या हातें राजकारण करून दग्यानें कोंडाणा किल्ला घेतला " असें जेधे-करीना म्हणतो.

शहाजी महाराजांना कैद केल्यावर महंमुद शहानें सिंहगड व बंगळूर हे दोन किल्ले द्याल तर तुमची सुटका करूं असें शहाजी महाराजांस कळविलें. शिवाजी महाराज, सिंहगड विजापूरकरांच्या हवाली करण्यास फारच नाखुष होते. पण अखेर सोनोपंताच्या युक्तिवादानें मन बदलून त्यांनीं तो विजापूरकरांना दिला. नंतर शहाजी महाराजांची सुटका झाली. ( १६ मे १६४९ )

१६५९ सालीं अफझुलखानानेंही महाराजांस निरोप पाठविला होता त्यांत 'तूं तह करून लोहगड पुरंदराबरोबर सिंहगड मोगलांना दे आणि जावळी आदिलशहाला दे ' असें कळविलें होतें. १६६३ अखेर या किल्यास जसवंतसिंगानें वेढा दिलेला नमूद आहे. तो वेढा २८ मे १६६४ रोजीं उठला.

४ फेब्रुवारी १६७० रोजीं हशमांचा सरदार तानाजी मालुसरा याला पाठवून महाराजांनीं सिंहगड जिंकला. त्यांत तानाजी व उदेभान रजपुत किलेदार हे दोघे ठार पडले. सिंहगड किल्याशीं इतर कितीही ऐतिहासिक गोष्टी संलग्न असल्या तरी तानाजीच्या धडाडीच्या युद्धप्रसंगामुळेंच सिंहगडास खरी प्रसिद्धि मिळाली आहे.

राजाराम महाराजांचा मृत्यु याच किल्यावर झाला.

## सिंहगड

श्रीशिवाजी महाराजके प्रसिद्ध दुर्गोंमेंसे एक है. उनके तानाजी नामके एक सरदारने मध्यरात्रीको गोधेके पूंछको रस्सा बांधकर उसके जरिये चढकर किला फतह किया. मगर तानाजी युद्धमें मारा गया इसही कारणसे यह सिंहगड नाम अजरामर हो चुका है.





Sinhagad Tanaji Precipice
सिंहगड तानाजी कडा



Sinhagad Cenotaph of Tanaji
सिंहगड तानाजाची समाधी



Bajiraje Ghorpade
बाजीराजे घोरपडे

# SHAHAJI AND BAJI GHORPADE

The Bhosales and the Ghorpades though originally belonging to the same Rajput Family stalk, were destined to play the roll of bitter enemies for several generations.

Rawalsinh a blueblooded Rajput Ruler of Chitore is claimed to be the first ancestor of these two branches. One of his three sons was invested with the Jahagir of Shisoda. In 1303 Allauddin invaded Mewar. He laid siege to Chitore, and after a protracted siege of six months captured it. Laxmansinh the then ruler of Shisoda and his seven brave sons fell on the field, while defending Chitore. Ajaysinh the only surviving son became master of Shisoda. He had two sons, named Sajjansinh and Kshemsinh. Ajaysinh proposed to install Rawal, the grandson of Laxmansinh, on his throne. This greatly alarmed his sons and they in disgust left their native land for the Deccan. Soon after Kshemsinh committed suicide and Sajjansinh settled near about Deogiri ( 1334 ).

A brave and tried soldier as he was, Sajjansinh soon attracted attention and was promptly promoted to higher ranks in the military service of the Deccan rulers. In about 1345 the province of Deogiri rose in rebellion against its rulers and so the Delhi Darbar had to dispatch a powerful Sardar (Hasan) to supress it. But strange as it was Hasan himself co-operated with the rebels, completely overthrew the Delhi rule, and founded an independent kingdom for himself. Sajjansinh who had greatly helped Hasan in his designs got his due reward. He was invested with the Jahagir of the Merath Province. Sajjansinh died in 1355. Dilipsinh his son was his father's equal in bravery and distinguished himself in the campaign against Vijaynagar. His grandson Bahirawaji secured the Jahagir of Mudhol in 1398.

In 1469 Karnasinh and Subhakrishna the brother-descendants of his family had to separate, and the former took service under Bahamani Kings while the latter went to Deogiri. In that year Karnasinh and his son Bhimsinh captured a very difficult hill-fort in Konkan by scaling the walls with the help of Gorpads or Mountain lizards.

This signal service was duly recognised and they were honoured with the proud title of Raje Ghorpade. Since then their family name was changed to Ghorpade.

In 1636 Shahaji had to seek service at Bijapur. Thenceforth he continued a Bijapuri Sardar to the last, and conquered a great part of Karnatak for his master.

In 1648 Mustafakhan laid siege to Jinji. Shahaji was ordered to help him. The siege was protracted and fighting continued long. Shahaji from the beginning had no heart in the whole affair, and wanted to retire. So Mustafakhan, suspecting serious mischief from Shahaji, determined to arrest him. On the 25th of August at dead of night, he and Baji Ghorpade got their forces ready and sent them to Shahaji's camp. A severe fight ensued. Shahaji was severely wounded and was made a prisoner by Baji Ghorpade. His camp was looted.

Neither Shahaji nor Shivaji could forget or forgive this conduct of Ghorpades. And when occasion arose, Shivaji amply avenged it.

In 1664 while Khawaskhan was marching to Kudal to expel Shivaji, Ghorpade with his contingent of 1500 horse wished to join him. But Shivaji struck the first blow and prevented the junction of the two forces. Baji Ghorpade was slain, and his force utterly routed.

## शहाजीराजे व बाजीराजे घोरपडे

बाजीराजे घोरपडे व शिवाजीराजे भोसले हे मूळ एकाच कुळांतले भाऊबंद व अस्सल रजपूत. असें असतां या दोन भाऊबंद घराण्यांनीं शिवकालांत एकमेकांविरुद्ध हत्यार धरून इतकें वेळां समरसंग्राम केले कीं त्याचा परिणाम या दोघांच्या हाडवैरांत झाला. दैवानें घडवून आणलेली ही एक अघटित घटनाच वाटते. घोरपडे व भोसले या कुळांची पूर्वपीठिका पाहिली म्हणजे याचा उलगडा होतो.

भोसले व घोरपडे यांचें मूळ चितोडचें राजघराणें. चितोडच्या रावलसिंहाच्या तीन मुलांपैकीं एक वंश म्हणजे शिसोदेकर. अर्थात् चितोड व शिसोदे येथील रजपूत राजे हे एका रक्ताचे निकट भाऊबंद. पुढें अजयसिंह राज्य करीत असतां एका बंडवाल्यावर त्यानें सज्जनसिंह व क्षेमसिंह या आपल्या दोन



Sujanasinha
सुजनसिंह



Bajiraje Ghorpade
वाजीराजे घोरपडे
( Mudhol Archives )

मुलांस पाठविलें; पण त्यांच्या हातून बंदोबस्त झाला नाहीं. तो बंदोबस्त लक्ष्मणसिंहाचा नातु—हमीर यानें केला. म्हणून अजयसिंहानें त्यालाच गादी देण्याचें ठरविलें; तेव्हां नाखूष होऊन त्याचे दोन औरस मुलगे सज्जनसिंह व क्षेमसिंह हे स्वदेश सोडून दक्षिणेंत आले. हा सज्जनसिंह हाच भोसले व घोरपडे घराण्यांचा मूळ पुरुष.

सज्जनसिंह दक्षिणेंत देवगिरीच्या आसपास येऊन राहिला. तो शूर व तरवारबहाद्दर असल्यामुळें त्यानें लवकरच नांव काढलें. तो सन १३३४ च्या सुमारास इकडे आला. त्यावेळीं त्याचें वय ४४ वर्षांचें होतें. अल्लाउद्दिन हसन नांवाचा मनसबदार दिल्लीहून पाठविण्यांत आला होता. त्यानेंच स्वत: बंड करून स्वतंत्र बहामनी राज्याची स्थापना केली. हसनला सज्जनसिंहानें चांगलें सहाय्य केलें. म्हणून हसननें सज्जनसिंग व त्याचा मुलगा दिलीपसिंग यांना देवगिरीच्या आसपासचे मेरठ प्रांतांतील १० गांव जहागिर दिले व खासखेलचे सरदार बनविले. सज्जनसिंग सन १३५५ त वयाच्या ६५ व्या वर्षी मेला. त्याचा मुलगा दिलीपसिंग त्यावेळीं २९ वर्षांचा होता. १३६० व ६२ च्या तेलंगणाच्या स्वाऱ्यांत व १३६६ सालच्या विजयनगरच्या स्वारींत विशेष पराक्रम केल्यामुळें दिलीपसिंगाचा गौरव वाढत गेला. त्याचा मुलगा व नातू सिद्धजी व भैरवजी यांनींही १३९७ सालापर्यंत अनेक स्वाऱ्या-शिकाऱ्या व मर्दुमीच्या लढाया केल्या. मुधोळची जहागीर भैरवास १३९८ त मिळाली. भैरवजीसच भोसाजी म्हणत आणि त्यावरूनच भोसले नांव रूढ झालें असावें. सन १४६० पर्यंत या भोसले कुळांतले कर्णसिंह व शुभकृष्ण हे भाऊ एकत्र होते. पण पुढें ते फुटून कर्णसिंह आपल्या भीमसिंह नामक मुलास घेऊन निजामशहाकडे गेला; व शुभकृष्ण देवगिरीकडेच राहिला. हा शुभकृष्ण म्हणजेच शिवाजीमहाराजांच्या भोसले कुळाचा मूळ पुरुष. भोसले कुळाचा मूळ पुरुष म्हणण्याचें कारण १४६९ च्या सुमारास कर्णसिंग व भीमसिंग यांनीं कोकणांतील एक असाध्य पहाडी किल्ला घोरपड लावण्याची युक्ति लढवून जिंकला व ' राजे घोरपडे बहाद्दर ' हा किताब मिळविला, म्हणून तेथपासून त्यांचें व त्यांच्या वंशजांचें आडनांवच घोरपडे पडलें. शुभकृष्णाचे वंशज भोसलेच राहिले.

इ. स. १६२४ च्या भातवडीच्या युद्धानंतर शहाजी भोसले आपल्या चुलत भावाशीं भांडून निजामशाहींतून अदिलशाहींत आला व पुढें १० वर्षांनीं त्यानें पेमगिरी येथें नवी निजामशाही निर्माण केली. अदिलशाही सरदार मुस्ताफाखान याच्या वजनामुळें नव्या निजामशाहींत व अदिलशाहींत वितुष्ट आलें. यामुळें

अदिलशाहीचा नोकर बाजी घोरपडे व शहाजी यांची समरांगणांत खणाखणी झाली. पुढें जिंजीचा वेढा चालू असतां या बाजी घोरपड्यानें शहाजीस कैद केलें. पुढें अफजलखानाबरोबर आलेल्या विजापुरी सरदारांत घोरपडे होतेच. अखेर १६६४ सालीं शिवाजीचें कोंकणांत खवासखानाशीं युद्ध चालू होणार होतें, तेव्हां बाजी घोरपडे रसद व फौज घेऊन खवासखानाच्या मदतीस जाण्याच्या तयारींत असतां शिवाजीनें त्यावर अचानक हल्ला केला. फार मोठें रण होऊन बाजी घोरपडे मारला गेला. बाजी घोरपड्याचा जन्म इ. स. १६०५ त झाला व मृत्यु १६६४ सालीं ५९ व्या वर्षीं झाला. हा पुरुष आपल्या इतर पूर्वजांप्रमाणेंच विलक्षण शौर्यशाली व एकनिष्ठ सेवक होता.

## शहाजी भोसले व बाजी घोरपडे

भोसले और घोरपडे यद्यपि एकही राजपूत कुलकी शाखायें हैं तो भी उनमें कौलिक शत्रुत्व पैदा होनेका दुर्भाग्य देख आता है.

उनका पूर्वज सुजनसिंह चितोडके शुद्ध राजपूत कुलका संतान था. उधर राज्य मिलने के बाबमें निराश होकर यह दखन चले आया.

इधर आनेके बाद इनको हसन गंगू बहमनीके लश्करमें नौकरी मिली. इसके शौर्यसे प्रसन्न होते हुवे हसन बहमनीने इनको दौलताबादके तर्फ कुछ जागीर अता किया. उसके पुत्रकोबी पराक्रमके कारन जागीर प्राप्त हुई.


उसके वंशजोंमेंसे एक भीमसिंहने कोंकणके एक किले की दीवार पर घोरपडोंके सहायसे चढकर उसको काबिज किया जिससे उसको व उसके अवलादको घोरपडे नामाभिधान प्राप्त हुवा.

भीमसिंहका चाचा वतने कदीम—जो दौलताबादके अतराफ था—जा बसा और उधर उसके वंशजोंको भोसले नामाभिधान कायम हुवा.

पहले पहले शहाजीके वक्त भोसले और घोरपडे से टंटा शुरू हुवा. उसका असल कारण कौनसा इसका ठीक पता नहीं चलता. लेकिन आपसका मत्सर और वतनका झगडा ही कारण मालूम होते हैं. शहाजीने यहां के वतनमेंसे कुछ हिस्से का दावा किया. मुहम्मद अदिलशाहने उसको घोरपडेके वतन का कुछ हिस्सा दिया. इससे घोरपडेको रंज पैदा हुवा और मत्सर बढता रहा. इ. स. १६४९ में शहाजीको कैद करनहारोंमें बाजी घोरपडे प्रमुख थे. इससे दोनों कुलका वैर ज्यादा बढ गया. आखिर इ. स. १६६४ में शहाजीके पुत्र शिवाजीने बाजी घोरपडेके साथ लढाई करके उसको मार डाला.



**Shahaji**
**शहाजी महाराज**




Fort of Bombay
मुंबईचा किल्ला

## THE FORT OF BOMBAY

On the 23rd of June 1661, a treaty of marriage was signed between Charles II and the Infanta of Portugal whereby the port of island of Bombay with all the rights, profits, territories thereunto belonging, was handed over to the English.

In 1664, the English garrison there numbered 103 privates with a sadly thinned list of officers.

Gerald Aungier was made the First Governor of Bombay. Under him Bombay became the established seat of the East India Companys' rule and the rest of the factories in Western India including Surat were placed under it. During his 16 years' regime Aungier was the contemporary of Shivaji. They eyed each other across the narrow boundary between English and the Maratha Dominions and though sometimes in conflict were never mortal enemies, never bosom friends.

Aungier improved the fortifications of the Bombay Fort in many ways.

Ovington who was at Bombay in 1689 described it thus:- "The Island lies in about 19 degrees North in which is a fort, which is the defence of it, flanked and lined according to the rules of art and secured with many pieces of Ordnance which command the Harbour and the parts adjoining. In this one of the Company's Factors always resides, who is appointed Governor to inspect and manage the affairs of the Island; and who is vested with an authority in civil as well as military matters, to see that several companies of Soldiers which are here, as well as Factors and Merchants, attend their various stations, and their respective charge."

## मुंबईचा किल्ला

२३ जून १६६१ या दिवशीं इंग्लंड व पोर्तुगाल यांचा तहनामा होऊन मुंबई बेट इंग्रजांच्या हवालीं झालें. तथापि तें प्रत्यक्ष कायदेशीर रीतीनें त्यांच्या ताब्यांत घेण्यास चार वर्षें लागलीं. अनेक भानगडींमुळें तो ताबा ह्यांना घेतां आला नाहीं. १८ फेब्रुआरी १६६४ रोजीं इंग्रजांचे पाय प्रत्यक्ष तेथें लागले. ताबा घेतल्याचा

दर्शक संस्कार म्हणून इंग्रजी अधिकारी कुक यानें तेथली मूठभर माती उचलली, दगड घेतले व तेथें असलेल्या गढीवजा इमारतीवरून फेरफटका केला. १६६५ सालीं डचांचा मुंबईकर इंग्रजांशीं बेबनाव झाल्यामुळें त्यांनीं या गढीजवळ ५१ यार्ड लांबीचा उंच ओटा किंवा मेढा घातला व त्यावर १८ तोफा चढविल्या. १६६९ सालीं लंडनहून हुकूम आला कीं, मुंबईच्या कोटाची तटबंदी वाढवावी व भक्कम करावी. समुद्रावरून व खुष्कीवरून येणाऱ्या कोणाहि शत्रूला अभेद्य होईल अशी कोटाची इमारत करावी. त्यानंतर काम सुरू झालें. १६७३ सालच्या रिपोर्टांत किल्ल्याचे बांधकामाविषयीं ऑंजियरनें पुढीलप्रमाणें हकीकत दिली आहे.

"किल्ल्याचें बांधकाम पुरें झाल्यावर मुंबई गांवाला व सबंध मुंबई बेटाला आधार होईल. किल्ला एका जमिनीच्या भुशिराच्या टोंकावर असून त्याच्या दोहों-बाजूंस खाड्या आहेत. त्याचा आकार चौकोनी आहे. त्याच्या तीन बुरुजांवरून बंदरावर मारा होतो व भोंवतालच्या दोन्ही खाड्यावरही नजर ठेवितां येते. चवथ्या बुरुजावरून शहर व किल्ल्यासमोरचें मैदान काबूंत राहातें. किल्ल्याचा घेर थोडा आहे व आकार वेडा वांकडा आहे."

शिद्याच्या भांडणामुळें शिवाजीचा मुंबईकरांशीं हर्षामर्ष होण्याचा प्रसंग आला. १६७२ सालीं शिद्दी याकूत शिवाजीच्या पेण, पनवेल, अलीबाग वगैरे तालुक्यास उपद्रव देण्याकरितां आपलीं गलबतें घेऊन मुंबई बंदरांत आला. आणि तेव्हांपासून १६९० सालापर्यंत शिद्यांचा इंग्रजांना उपसर्ग पोंचला. शिद्यानें ऑंजि-यरला सांगितलें कीं, शिवाजीशीं लढण्याकरतां तूं मला सामील हो. पण त्यानें तें नाकारलें. कारण मुंबईकरांना खुष्कीच्या बाजूनें मिळणारी दाणागल्ला व लांकूड-फांट्याची मदत शिवाजीच्याच मुलुखांतून होई.

## किले बम्बई


यह किला बम्बई नामक एक द्वीपके पश्चिम किनारेपर भूमध्य रेखासे १९ अंश उत्तरमें बसा हुवा है. सन १६६१ में जब इंग्लैंडका बादशाह दूसरा चार्लस और पोर्तुगालकी बादशहजादी इनफंटा इनउनकी शादी हुई इसवक्तकी संधीने यह किला पोर्तुगीझ लोगोंसे अंग्रेजोंके हात आया. इसपर अंग्रेजी गव्हरनरका अमल चलता था. वह अंग्रेजोंके कारखाने और व्यापार सुरक्षित रखनेकी कोशिश करता था. उसके अधिकारमें अंग्रेजी फौज भी रहती थी. पश्चात् अंग्रेजोंने सूरत छोडकर बम्बई अपना मुख्य ठाना कायम किया. सन १६८९ इसवीमें ओव्हिंगटन बम्बईका गव्हरनर था. इस किलेपर सिर्फ चार तोपें थी. जनरल ऑंजियर यहांका पहला गव्हरनर हुवा.



Shivaji

शिवाजी

[ Manucci ]



Hill-fort of Mahuli
माहुली किल्ला

## MAHULI-FORT

Mahuli, the most impregnable hill-fort of high altitude, is situated four miles to the North-west of Shahapur in the Jawhar State. It rises 2815 ft. above sea-level and has three terraces or machees named Palasgad, Mahuli and Bhandardurg respectively.

Shahaji occupied the fort in 1635, but had to retire in the following year, when Khan Jaman invested it. In 1661 Shivaji captured this fort for himself but soon after the Moghals wrested it from him.

In 1670 Shivaji detached a strong force under Moropant Pingale to besiege it. He led repeated assaults on the fort and at last captured it on the 16th of June. The Mogal commandant Alawirdi Khan and his hoard of soldiers were killed.

## माहुली

हा किल्ला ठाणें जिल्ह्यांतील शहापूर पेठ्यांत शहापूर गांवाच्या वायव्येस सुमारें चार मैलांवर आहे. याची उंची २८१५ फूट आहे. त्याला तीन माच्या आहेत. उत्तेरची पळसगड माची, मध्याची माहुली माची आणि दक्षिणेची भंडारगड माची. पुढें इ. स. १६३५ सालीं हा किल्ला शहाजीमहाराजांच्या ताब्यांत आला. १६३६ त खान-जमानानें वेढा दिल्यामुळें त्यांना तो सोडून जावें लागलें. १६६१ त तो शिवाजीमहाराजांनीं जिंकला. पण पुढें लगेच तो मोंगलांनीं परत हिसकावून घेतला. फिरून १६७० सालीं महाराजांनीं मोरो त्रिमल पेशव्यास पाठवून दोन महिने वेढा देऊन तो जिंकला.

## किले माहुली

यह किला जव्हार रियासतमें शहापूर गांवसे चार मीलके फ़ासलेपर है. यह बहुत उँचे पहाड़पर बसा हुवा हैं. इसमें तीन छोटे किले हैं. इनके नाम पलसगढ़, माहुली और भंडारदुर्ग है. यह किला सन १६३५ इसवीमें शहाजीके अधिकारमें था. अगले वर्ष खान जमानने अपने काबूमें लाया. शिवाजीने सन १६६१ इसवीमें इसपर हमला किया मगर इसको अपने काबूमें न ला सका. सन १६७० इसवीमें मोरोपन्त पिंगलेने बडे ज़ोरसे हमला करके मुगल सेनापति अलाविर्दीखांको मार डाला और शिवाजीके लिये यह किला काबूमें लाया.

## PARALI OR SAJJANGAD

Parali or Sajjangad Fort, about, 1045 ft. above the plain and 1824 yards in circumference, lies on a detached Sahyadri spur about 6 miles west of Satara. Inspection reports of 1850 and 1881 describe the fort as surrounded and commanded by three hills, Yavteshwar about 3500 yds. to the North, old Satara about 2500 yards to the South and Nanka within 1100 yds. to the South-west.

The defences consist of a scarp of perpendicular black rock varying in height from about 100 feet along the faces to about 50 ft. at the South-west angle of the fort. The scarp is built up in places, but except near the gateway and at the South-west angle which appears to have been strongly fortified, little of the old parapet remains. The South-west angle is only a place practicable for an escalade as in other places the rock is too high and the hill below it too steep to allow ladders to be placed against it, while there is no cover from the fire of the fort.


Shivaji captured this hillfort on 1st of April 1673. He installed his Guru Ramdas on it.

## परळी

किल्ले परळी ऊर्फ सज्जनगड हा किल्ला साताऱ्याजवळ आहे. हें श्रीसमर्थांचें वृद्धापकाळचें वसतिस्थान. शिवाजी महाराजांनीं भक्तिभावानें स्वामीस येथें स्वास्थ्य करून दिलें. स्वामींचें देहावसान येथेंच झालें. किल्ल्यावर स्वामींची समाधि आहे. तेथें स्वामींच्या म्हणून अनेक वस्तू अद्यापहि काळजीपूर्वक जतन करून ठेविल्या आहेत. त्यांत कुबडी, खडावा, वगैरे प्रेक्षणीय आहेत. हा किल्ला शिवाजी महाराजांनीं १ एप्रिल १६७३ रोजीं जिंकला.


## परेली या सज्जनगढ़

परेली या सज्जनगढ़ किला ज़मीनसे १०२८ फूट ऊँचाईपर और घेरेमें १८२४ यार्ड है. यह सतारा शहरसे पश्चिम और दक्षिण दिशामें छ मिलके फांसले-पर है. यह किला अभी तक ठीक मजबूत मालूम होता है.



**Sajjangad View**

**सज्जनगड लांबून देखावा**



Swami Ramdas
स्वामी रामदास

## RAMDAS-SWAMI

Swami Ramdas was the accredited Guru of Shivaji Maharaj. Born of essentially orthodox parents, he had from his very boyhood developed a passion for religion and at the very premature age of only fourteen renounced the world and became an ascetic. For a score of years thereafter he travelled far and wide into the country visiting sacred places and studying the condition of the Hindoo population. After completing his pilgrimages he settled at Masur in the Satara District. His heart was touched to the core from what he had witnessed of the appaling state of the Hindoos and their religion, and was fully convinced that foreign rule alone was responsible for the disaster.

He always cherished the dream of a powerful Hindoo King defending his religion and so when he happened to hear of Shivaji's successes he enthusiastically applauded him as the defender of the Hindoo Faith. A meeting of them both was naturally inevitable. Historians disagree as to the exact year of that event. One puts it in 1649, another in 1672 while yet another puts it in 1659. It is however certain that Shivaji openly claimed Ramdas as his Guru and installed him on the Fort of Sajjangad.

As was the fashion with the other poet saints of that time, Ramdas has a mass of poetical literature to his credit. But what marked him as the most independent figure among them, was his originality and rare organising capacity. His revival of the worship of Ram and Maruti, deities of valour and strength and the establishment of more than eighty Hindoo-Missions or Maths which still survive, are a permanent monument to his constructive genius.

He died in 1681.

# रामदास-स्वामी

रामदास-स्वामी यांचा जन्म शके १५३५ कीलकनाम संवत्सरे चैत्र शुद्ध नवमीस झाला. वडिलांचें नांव सूर्याजीपंत व आईचें नांव राणूबाई. रामदासांचें बाळपणचें नांव नारायण असें होतें. लहानपणापासून नारायण हे देवभक्त होते. त्यांचा देवाचा नाद दिवसेंदिवस वाढला व लग्नाच्यावेळीं ते मुकाट्यानें घरांतून पळून गेले. पुढें अनेक वर्षें गायत्री पुरश्चरण, तपश्चर्या, तीर्थयात्रा वगैरे करून ते नासिक पंचवटीवरून मसूरास आले. त्यांनीं सुप्रसिद्ध आकरा मारुतींची स्थापना केली. शिवाजी महाराजांची व त्यांची भेट कधीं झाली यासंबंधीं वाद आहे. एक पक्ष ती शके १५७१ त झाली म्हणतो. दुसरा शके १५९४ म्हणतो, तर तिसरा शके १५८१ त म्हणतो. रामदासांनीं हिंदुस्थानभर ठिकठिकाणीं अनेक मठ बांधले. शिवाजी महाराजांनीं त्यांना सज्जनगडास जागा करून दिली. ते सन १६८१ सालीं समाधिस्थ झाले. दासबोधादि त्यांची उज्वल ग्रंथसंपत्ति सुप्रसिद्ध आहे.

# रामदास

रामदासस्वामी श्रीशिवाजी महाराजके गुरु माने जाते हैं. बचपनसेही उनकी मति धर्मप्रवण थी और शादीके समयपर घरबार छोडकर आप विरावी हो गये. करीब २४ बरस तक तपस्या और तीर्थयात्रा करके आप मसूर ( जिला सितारा ) आ बसे. आपने पर्यटन करते हुवे हिन्दुधर्म तथा लोगोंकी दुर्दशा देख कर निश्चय किया की यह सब परराज्यका फल है.


मसूर आने के बाद जब आपने शिवाजीमहाराजका सुयश सुना तब आपने उनको धन्यवाद दिये. आपकी और महाराजकी मुलाकात कब हुई इसका ठीक पता नहीं चलता. कोई इ. स. १६४९ और कोई १६७२ में मुलाकात हुई ऐसा मानतें हैं. और कोई इ. स. १६८१ भी बतलाते हैं. चाहे वैसा हो महाराज आपको गुरु मानते थे और आपको सज्जनगढमें बसाया इतना तो बिलकुल साफ है.

उस ज़मानेके मुख्तालिफ़ साधूकवियोंके मुवाफिक आपने भी बहुतसा कवित्व किया है. लेकिन आपने जो मौलिकता बताई और संघटन किया उससे आपकी योग्यता हम साधूकवियोंसे ज्यादा समझी जाती है. और बलदेवता हनुमानजी के भक्तीका जो पुनः प्रचार किया और करीब अस्सी हिन्दूमठोंकी स्थापना की जो आजतक विद्यमान है, वही उनकी संघटनमतीका स्मारक है.


आप इ. स. १६८१ में रामधाम पधारे.



Sajiangad Crutch and other things of Ramdas
सज्जनगड रामदासांच्या वस्तु



Sajjangad Gate
सज्जनगड दरवाजा



Janjira

जंजिरा

## JANJIRA

The fortified island of Janjira lies just within the entrance of the Rajpuri creek, the main land being half a mile distant to the East. In shape it is irregularly oval or nearly round and it is girt by walls which at high tide rise abruptly from the water to a height of from 45 to 50 feet. At low tide the water recedes, leaving the rock foundations on which the walls are built, dry. On the east side opposite Rajpuri is a large and handsome entrance gateway with steps leading to the water and on the west facing the open sea a small postern gate used in former years in times of siege, leads into a wide masonry platform about 20 feet above high water-mark. The walls are battlemented, strongly loop-holed and their faces are covered with nineteen bastions 80 feet across and 30 feet deep, at intervals of about ninety feet.

## जंजिरा

जंजिऱ्याचा बेटवजा किल्ला समुद्रांत असून फार अभेद्य म्हणून पूर्वीपार प्रसिद्ध आहे. त्याला १९ बुरुज आहेत. शिवाजीमहाराजांनीं जंजिरा घेण्याचा भगीरथ प्रयत्न केला; पण तो यशस्वी झाला नाहीं. १६६१ सालीं जंजिरेकरांचा व शिवाजीचा झगडा झाला. त्यासालीं शिवाजीनें सैन्य पाठवून शिद्द्याची तळाघोसाळा हीं मातब्बर स्थळें जिंकून दंडाचा किल्लाही घेतला आणि अखेर खुद्द जंजिऱ्यासच मोर्चे दिले. तेव्हां शिद्द्यानें तह करून दंडाराजपुरी शिवाजीस दिली. पण हा तह टिकला नाहीं. पुढें १६७५ सालीं शिवाजीनें समुद्रांतून जंजिऱ्यावर हल्ला करण्याची तयारी केली. एक चकमकही समुद्रांत झाली, पण शिद्दी बचावला. १६७६ सालीं शिद्दी संबूळ शिद्दी कासीमशीं भांडून शिवाजीस येऊन मिळाला. १६७८सालीं शिवाजीनें दौलतखानास पाठवून जंजिऱ्याचा वेढा सुरू केला पण तोहि व्यर्थ गेला. सारांश अनेकवार प्रयत्न करूनही शिवाजीला जंजिरा जिंकता आला नाहीं.

## किले जंजिरा.

कोंकणके पश्चिम किनारेपर राजपुरी खाड़ीके मूँहमें जंजीरा नामक एक द्वीपपर यह दुर्ग अभीतक मौजूद है. इसकी एक ओर समुद्र है और तीनों ओर राजपुरी खाड़ीका प्रवाह बहा करता है. इसके दो दरवाज़े हैं. पूरबकी तरफका दरवाज़ा बहुत बड़ा है और पश्चिममें एक छोटासा किंवाड है. इसका हरएक बुर्ज ८० फूट चौड़ा, ३० फूट ऊंचा और एक दूसरेसे ९० फूटके फ़ासलेपर है. इनकी संख्या १९ है.

## RAIGAD

Raigad, near Mahad, in the Kolaba District is a strong hill-fort of stupendous size. Advantageously situated near the coast line it commands the sea on the left and the ghats on the right. It is known as the Gibralter of the East.


After the conquest of Jawali in 1656 Shivaji attacked this stronghold of Chandrarao More and drove him out from his last refuge. Since then this fort continued in his possession to the last day of his life and never for once changed hands.

On 6-6-1674 Shivaji publicly proclaimed himself an independent Sovereign and made Raigad the capital seat of his Government. The imposing coronation celebrations were carried on for many days. Henry Oxinden who was specially deputed by the English of Surat to induce Shivaji to enter into a friendly alliance with them, was present at the coronation ceremony. He presented the Rajah with a diamond ring.

Apart from this unique event Raigad claims also to have witnessed many other events of historical importance. The wedding ceremony of Rajaram, Shivaji's younger son, with the daughter of Prataprao Gujar was performed here on 15-3-1680. Shivaji celebrated the occasion with befitting pomp and grandeur.

Jijabai mother of Shivaji died here in her 80th year on 18-6-1674. She was fortunate enough to have witnessed the coronation of her great son only a week before her death.


The last days of Shivaji Maharaj were spent on this fort. After a short period of illness he passed away on the 3rd day of April 1680.




Tomb of Jijabai
जिजाबाईची समाधी




Raigad Tomb of Shivaji
रायगड शिवाजीची समाधी



Throne of Shivaji
सिंहासन



Remains of the market place
बाजार पेठ



Jagadishwar Temple
जगदीश्वर देवालय



Hirkani Point
हिरकणी टोंक

# रायगड

हा विकट, उंच व बहुत नामी किल्ला महाडाजवळ आहे. प्रथम महाराजांची राजधानी राजगडास होती. पुढें रायगडासच त्यांनीं राजधानी केली. महाराजांनीं हा किल्ला १६४६ सालीं जिंकला.

" रायगड जागा बहुत थोर, बांकी, बेलाग, किल्ला फार चांगला, राजधानीस योग्य स्थळ जाणून किल्याचें काम इमारत आबाजी सोनदेव यांस सांगून कडे तासविले, बंदिस्त केलें, आणि बेलाग केला, आणि आंत राज--मंदीर, दौलत--बंक; प्रगटसभा व मंत्रसभा व धर्मसभा व चित्रसभा व आदर्श मंदिर ऐशीं नांवें ठेवून त्याप्रमाणें जागे बहूत तरतुदीचे व माहाल राण्यांचे निराळे निराळे, याप्रमाणें खाजगत राहाण्याची जागा करविली. तशीच पागा घोडियांस राहाण्याची चिरेबन्दी, लादणीचीं घरें, गजशाळा, पाकशाला, कोठी वगैरे अठरा कारखाने, बारामहाल, यांचीं स्थळें करविलीं. बाजार दुरुस्ती चिरेबन्दी जोतीं घालून करविला. मातबर सर-कारकून, सरदार व कारकून लोक यांस घरें सरकारच्या इमारती करून ठेविलें. ज्याची जशी योग्यता तशीं ( घरें ) करून दिलीं."

दिल्ली दरवाजा पुण्यांतील शनिवारवाड्याच्या उत्तरेकडील दरवाजासारखा उभट मुसलमानी कमानीचा आहे. दरबार--मंडपाची मांडणीही दिवाण-इ-खासच्या मांडणीप्रमाणें असावी असा तर्क आहे. तेथल्याप्रमाणेंच दरवाजाच्या समोर दुसऱ्या बाजूला मधोमध उंच जाग्यावर सिंहासन बांधलेलें आहे. देवीच्या मंडपांत दरबार भरविण्याची पद्धति पुढें पडली असावी. तथापि मंडपाच्या एका बाजूला सिंहासनाचें स्थान वेगळें असें. मंडपाच्या भोंवतालच्या ओऱ्या अद्याप दिसतात. तसेच दुसरे वाडे, बाजार पेठ यांचे अवशेष व कांहीं देवळें वगैरे पाहून त्यावेळची शिल्पकला समजण्यासारखी आहे. रायगड निसर्गतःच दुर्भेद्य असून ज्या कित्येक लहान जागीं मूळचे कडे नाहींत तेथें २४ फूट उंचीचा तट बांधला आहे. ४० फुटांवर लगेच दुसरी भिंत बांधून हा किल्ला इतका दुर्भेद्य बनविला आहे कीं, अन्नाचा भरपूर पुरवठा झाल्यास हा किल्ला अगदीं अल्प शिबंदीच्या सहाय्यानें जबरदस्त शत्रूविरुद्ध लढूं शकेल. पाण्याकरितां मोठे तलाव असून ते पावसाळ्यांत भरल्यावर पाणी पुरून उरेल इतकें होतें.

सन १६७० त महाराज रायगडास होते. तेथून निघून त्यांनीं मोंगलाईंत स्वाऱ्या केल्या आणि जुन्नरास वेढा दिला.

५ जून १६७४, ज्येष्ठ शु. १३ शुक्रवार शके १५९६ आनंद संवत्सरांत महाराजांना राज्याभिषेक झाला.

इ. स. १६७८ मध्यें गदग प्रांत काबीज करून महाराज रायगडास आले.

इ. स. १६७९ च्या कार्तिक महिन्यांत महाराजांनीं जालनापूर लुटून रायगडास प्रयाण केलें.

२८ सप्टेंबर १६७९ रोजीं रायगडावर तरवारींतून ज्वाला निघण्याचा चमत्कार घडला.

१५ मार्च १६८०, फाल्गुन व॥ १० शके १६०१ रायगडावर राजाराम महाराजांच्या लग्नाचा सोहळा झाला. प्रतापरावाच्या मुलीशीं लग्न झालें.

३ एप्रिल १६८०, चैत्र शु. १५ शनिवार शके १६०२ रोजीं मध्यान्हीं महाराज कैलासवासी झाले.

## रायगढ़

रायगड़ कुलाबा जिलेमें महाड नामक एक तहसलिमें महाड गांवके पास है. यह किला चंद्रराव मोरेके काबूमें था. वह शिवाजीने सन १६५६ इसवीमें अपने तावेमें लिया. इसी किलेपर शिवाजी महाराज का राज्यभिषेक समारोह बड़े धुम-धामसे सन १६७४ ईसवी में बनाया गया था. उनकी माता राज्यारोहण समारोह होने के बाद एक हप्तेमें ही इसी किलेपर स्वर्गस्थ हुई. शिवाजीमहाराजका दुसरा पुत्र राजारामकी शादी यहही रायगढ़ किलेपर हुई. खुद शिवाजीका देहान्त इसी किलेपर सन १६८० इसवीमें हुवा.





Raigad Distant View
रायगड लांबून देखावा




Nagarkhana
नगारखाना



Raigad Takmak Point
रायगड टकमक टोंक



Raigad Inscription on the Jagadishwar Temple
रायगड जगदीश्वरावरील शिलालेख



Gangasagar Tank
and the Royal Palace
गंगासागर तलाव व मनोरे

## BHUSHAN-BHAT

As the author of Shivābāvani, a lucid, poetical work commemorating Shivaji, Bhushan is wellknown to Indian readers. He was born in 1616, in a Kanoj Brahmin Pandit's family, at Tikamapur in the Cawnpore District. He was the second among the four sons of his father–Ratnakar Pandit. The eldest was Chintamani. He was a scholar of great repute and was retained in the royal services as a court poet by the Emperor Aurangzeb. Matiram and Nilkhanth, Bhushan's two younger brothers were also Pandits of considerable merit, and flourished in different courts.

Shivaji's increasing fame as the liberator of Maharashtra, attracted Bhushan to this land in 1667. He secured an audience with Shivaji on Raigad and so impressed him with his rare gifts of versification that he was promptly admitted into royal service. Since then he was constantly with the Raja for the succeeding 7 or 8 years. There he commenced his work of Shivaraj Bhushan which was completed in 1674. He was amply rewarded for that.

He died in Bundelkhand at the far advanced age of 102 in 1718.

## भूषण भाट

भूषणाचा जन्म १६१६ सालीं तिकमपूर नांवाचें कानपूर जिल्ह्यांत एक गांव आहे तेथें झाला. याचा बाप रत्नाकर पंडित हा एक नामांकित विद्वान पुरुष होता. त्याला ४ मुलगे. (१) चिंतामणी (२) भूषण (३) मतिराम आणि (४) नीलकंठ. हे चारी मुलगे अत्यंत विद्वान म्हणून पुढें प्रसिद्धीस आले. थोरला चिंतामणी हा खुद्द औरंगजेब बादशहाच्या पदरीं असून तेथें आपल्या कवित्व गुणांनीं फार ख्याती पावला. भूषण हा बरेच दिवस आपला थोरला भाऊ चिंतामणी याच्याजवळच राहत असे. पण एक दिवस भावजयीच्या कांहीं दुरुत्तरामुळें रागावून तो घराबाहेर पडला व त्यानें

स्वतंत्रपणें आपल्या विद्वत्तेच्या व कवित्वाच्या जोरावर स्वत:चा उत्कर्ष करून घेतला. कांहीं दिवस चित्रकूटचा राजा रुद्रराम सोळंखी म्हणून होता, त्याच्या पदरीं तो राहिला. तेथेंच त्याला कविभूषण ही पदवी मिळाली. पुढें शिवाजी महाराजांचे पराक्रम व कीर्ति ऐकून तो दक्षिणेंत येऊन महाराजांना भेटला त त्यांच्या पदरीं राहिला. त्यानें शिवराजभूषण नांवाचा एक अलंकारशास्त्रावरील ग्रंथ लिहिलेला प्रसिद्ध असून त्यांत शिवाजीच्या निरनिराळ्या पराक्रमांचें काव्यमय व अलंकारिक रीतीनें वर्णन केलें आहे. शिवबावनी हा ग्रंथ त्याच पुस्तकांतील एक भाग असें समजतात. १८ व्या छंदांत पुढील सुंदर रूपक त्यानें शिवाजीवर रचलेलें आढळतें.:—या रूपकांत त्यानें उत्तरेकडील संस्थानिकांना एक एक फुलाची उपमा दिली आहे व म्हटलें आहे कीं—औरंगजेबरूपी भ्रमर या सर्वांपासून रसरूपी करभार वसूल करतो. पण शिवाजी हा पिवळ्या चाफ्याच्या फुलासारखा संपन्न व मधुर पण उग्र असल्यामुळें तो त्याच्या वाटेस जाऊ शकत नाहीं. शिवबावनी मधील ५२ श्लोकांबद्दल प्रत्येकीं एक एक लाख होन भूषणानें मिळविले अशी आख्यायिका आहे. भूषणाचें शिवराजभूषण, भूषणहजारा, भूषणउल्लास, दूषणउल्लास हे ग्रंथ व इतरही पुष्कळ स्फुट कविता आहेत. हिंदी साहित्यांत चंद्रकृत पृथ्वीराज रासा या ग्रंथाच्या तोडीची मान्यता शिवराजभूषणास आहे.

भूषण फारच वृद्ध होऊन वयाच्या १०२ व्या वर्षी वारला. शिवाजी महाराजानंतर तो छत्रसालच्या पदरीं होता. १७१५ त तो शाहूस भेटल्याचाही उल्लेख एका कवितेंत आहे.

## कवि भूषणभट्ट

कानपूर जिलेमें कवि भूषणभट्टका जन्म सन १६१६ इसवी में हुवा. उनके पिता कान्यकुब्ज ब्राह्मण थे. वे बडे पंडित थे. कवि भूषणभट्टका बड़ा भाई औरंगजेब बादशाहके दरबारका आश्रित था. कवि भूषणभट्ट सन १६६७ इसवी में महाराष्ट्रमें शिवराजकी कीर्ति सुनके आ पहुँचे. उनकी कवित्वशक्तीपर शिवाजी महाराज बहोत खुश हुवे और उनको अपने साथ रहनेकी उन्होंनें आज्ञा दी. अनन्तर उन्हें "शिवराजभूषण" नामक काव्यकी रचना की. वे सन १७१९ इसवी में बुंदेलखण्डमें स्वर्गवासी हुवे. उस वक्त उनकी उमर १०२ वर्षकी थी.



Bhushan-Bhat
भूषण भाट